
सोमवार, १३ मार्च २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१९५
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक



● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● MONDAY 13 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-195 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5




# आलो नाथा तुझ्या घरी...

## नाथनगरी वारकऱ्यांनी दुमदुमली; नाथषष्ठी सोहळ्याला उत्साहात सुरूवात

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण : आलो नाथा तुझ्या घरी... भानुदास एकनाथ नाममुखी देव आनंदी सदा... म्हणत रविवारी (१२) पैठण नगरीत शेकडो दिंड्या दाखल झाल्या असून गोदावरी नदीचा वाळवंट, प्रतिष्ठान कॉलेज परिसर, विविध मठ, उद्यान परिसर आदी ठिकाणी दिंड्या आपा आपल्या फडावर सायंकाळी विसावल्या. षष्ठी निमित्ताने नाथ समाधी मंदिर व परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसले आहेत तसेच मंदिर परिसरात भाविकासाठि पिण्याचे पाणी तसेच भोजनाची सोय करण्यात आली असल्याची माहिती नाम संस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा बारे यांनी दिली.**

दरवर्षी सात लाखांपेक्षा जास्त भाविक उपस्थित राहतात . यंदा मात्र वारकऱ्यांची संख्या कमीच आहे. नैसर्गिक संकटांमुळे ती कमी झाली असावी, असा अंदाज वर्तवला जात आहे. पोलीस प्रशासनाने जय्यत तयारी केली असून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून पोलिस प्रशासनाकडुन मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. सकाळपासून पैठण संभाजीनगर, पैठण -पाचोड पैठण - शेवगाव, शहागड आदी विविध मार्गावरून नाथ षष्ठी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी दिंडया मार्गक्रमण करीत होत्या.

संत ज्ञानेश्वर महाराज यांचे आपेगाव येथून ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा नाथ षष्ठी उत्सवासाठी पैठण नगरीत दाखल होताच माऊलीचे जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळच्या दिंडीचे पैठण दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. यावेळी प्रा. युवराज औटे, ज्ञानेश्वर कापसे, रामेश्वर सुसे, बंडु गाढे, अनंत औटे स्वदेश पांडे, जितेंद्र पांडे, सचिन उंडाळे, दिनेश पेंढारकर यांनी जोरदार स्वागत केले.




नाथषष्ठीनिमित्त संत एकनाथ महाराज यांच्या समाधीस्थळी अगुंरांची आकर्षक आरास करण्यात आली.


## 'काँग्रेस मोदीची कबर खोदण्यात व्यस्त'

आधुनिक केसरी न्यूज

**बेंगलुरू :** कर्नाटकमध्ये काही महिन्यांत विधानसभा निवडणुका पार पडणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यावर्षी सलग सहाव्यांदा कर्नाटक दौऱ्यावर आहेत. पंतप्रधानांनी बेंगलुरू-मैसूर या ११८ किलोमीटरच्या महामार्गाचे उद्घाटन केले. यावेळी पंतप्रधानांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

मांड्यात सभेला संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले, डबल इंजिन सरकारचा उद्देश तुमच्या प्रेमाची परतफेड 'विकासा'च्या रूपात करण्यात आहे. लोक बेंगलुरू-मद्रास महामार्गाबद्दल बोलत आहेत. त्याचे फोटो व्हायरल करत आहेत. देशातील तरूणांमध्ये या प्रकल्पाबाबत उत्साह दिसून येत आहे. काँग्रेस आणि त्यांचे मित्र मोदींची कबर खोदण्याचं स्वप्न पाहत आहेत. काँग्रेस मोदींची कबर खोदण्यात व्यस्त आहे. पण, मोदी बेंगलुरू-म्हैसूर महामार्ग बनवण्यात व्यस्त आहे. तसेच, मोदी गरिबांचे जीवन सुखकर करण्यात व्यस्त आहे, असे पंतप्रधानांनी सांगितले.







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

रात्रीची शांत वेळ. शहरातली वर्दळ आता कमी झाली होती. रस्ते मोकळा श्वास घेऊ लागले होते. कधी कधी रात्रीची शांत वेळ मला फिरण्यासाठी योग्य वाटते. बऱ्याच वेळा मी या गोदावरीच्या काठी येऊन बसतो. गोदामैया शांतपणे वाहत असते. तिच्या पात्रामध्ये दिव्यांचे छान प्रतिबिंब पडलेले असते. आजबाजूला असणाऱ्या अंधाराच्या पार्श्वभूमीवर गोदामैयाचे हे रूप मला भावते. दिवसभर तिच्या काठाशीही वर्दळ असते. भाविक येतात, व्यापारी येतात, श्रीमंत, गरीब, लहान थोर सारे सारे गोदामाईचा आश्रय घेतात. पण रात्री आपापल्या मुक्कामी निघून जातात. गोदामाई काही म्हणत नाही. पण रात्रीच्या शांत वेळी तिच्या तीरावर जाऊन बसावं. ती यावेळी निवांत असते. दिवसा तिला काही बोलावसं वाटत नसलं तरी यावेळी ती आपलं मन मोकळं करते. असाच मी तिच्या कुशीत जाऊन बसलो. अंमळ थंडीच होती. पण तिच्याजवळ बसलं की सगळं काही विसरायला होतं. माई म्हणाली, ' आलास. ये. बैस जरा. तुला खूप काही सांगायचं आहे. पण त्या आधी तिकडे पलीकडे माझी सखी उभी आहे. आम्ही दिसायला वेगवेगळ्या असलो तरी माझा आणि तिचा आत्मा एकच आहे. तू माझ्याकडे जसा हक्काने येतोस, तसाच तिच्याकडेही जा. तिची थोडी विचारपूस कर. मग पुन्हा तुझ्याशी बोलायला मी आहेच. ' मी म्हटलं, ' माई, तू काळजी नको करुस. मी जातो लगेच तिच्याकडे आणि तिला काय हवं नको ते पाहतो. ' मी गेलो. खरंच भरजरी वस्त्र लेऊन एक कुलीन, घरंदाज स्त्री उभी होती. कपाळावर कुंकवाचा टिळा होता. मुद्रेवर न लपणारं विलक्षण तेज होतं. मी तिला प्रणिपात केला. म्हटलं, ' मला गोदामैयाने पाठवलं तुमच्याकडे. कोण आपण . ? मी आपल्याला काही मदत करू शकतो का ? क्षणभर ती माऊली स्तब्ध होती. मग म्हणाली, ' असं परक्यासारखं नको बोलूस रे. मी तुझी आईच आहे. एका आईनं तुला जन्म दिला.



## आनंदी पहाट

## कलेतील सौंदर्याच्या शोधासाठी प्राधान्य द्यावे

आधुनिक केसरी

आपल्या दैनंदिन जीवनात आपण नेहमीच सौंदर्याला प्राधान्य देत असतो. ते मिळवण्यासाठी आपण विविध प्रकारे प्रयत्नशील असतो. ह्या सौंदर्याची व्याख्या करणं शक्य असलं तरीही त्याची प्रचिती प्रत्येकानं स्वतंत्ररित्या अनुभवायची असते. व्यक्ति तितक्या प्रकृती, त्यामुळेच प्रत्येकाला सौंदर्याची प्रचिती निरनिराळ्या प्रकारे येत असते. जगण्यापलीकडचं जीवन जगणे, ही देखील एक अत्यंत महत्वपूर्ण कला आहे. आपल्या प्रत्येकाच्या जीवनांत अगदी जन्मापासून प्रत्येक क्षणामध्ये, बाबीमध्ये सौंदर्याचा शोध आपण घेतला पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

ह्या सौंदर्याच्या प्रचीतीमुळेच आपला जीवन जगण्याचा अनुभव हटके असू शकणार आहे, ह्याची जाणीव होणं गरजेचं असतं. कला ही विविध गोष्टीतून आपल्याला दिसून येत असते. हि कला जोपासण्याचं, तिचं अस्तित्व टिकवून ठेवण्याचं काम हे आपण प्रत्येकजण निरनिराळ्या प्रकारे करत असतो. अशा ह्या कलेचे कोणकोणते उपयोग आपल्याला होतात ? त्यामुळे आपली संस्कृती कशी अबाधित राहते ? ह्याची जाणीव करून घेणं गरजेचं असतं. एखाद्या कलाकारास त्याचे विचार जगासमोर आणायचे असतील तर ते कलेच्या विविध माध्यमातून तो आणत असतो. चित्रकला, शिल्पकला, नाट्यकला, नृत्यकला, पाककला, हस्तकला अशा अनेकविध माध्यमातून साकारलेल्या कलेतून आणि मांडलेल्या अविष्कारातून नवीन पिढीपर्यंत त्याला त्याचे विचार पोहोचवता येतात. कोणतीही गोष्ट त्याच्या कलेने करणे म्हणजे कला. एखादी कला अवगत असल्याने त्या कलाकाराला लोकप्रियता मिळते. कला निर्माण होते, ती स्वतःमध्ये असलेल्या सुप्त गुणांमुळे, कला ही विविध पर्यायांच्या रुपात दिसून येत असते, साकारली जात असते. अंगी कोणतीही कला नसणं ही खरं तर उणिवच म्हणावी लागेल.



आधुनिक केसरी

**विठा मुक्ता जना | माय झाली ||**
काय भेदाभेद | राव-रंक आम्हा ||
केशव-सुदामा | पुज्य आहे ||१||
विठ्ठल संवादे | नामाची वैखरी ||
धन्य ही पायरी | पुण्यवंत ||२||
चोख्याच्या वाणीत | अभंग झुलतो ||
देवही डोलतो | गाभाऱ्यात ||३||
नरहरी सांगे | हरि- शीव एक ||
द्वैताचे बीजक | जळो आता ||४||
ज्ञानाने गुनफीली | अद्वैताची माळ ||
वैष्णवांचा मेळा | तुका दावी ||५||
आता भेदाभेद | उरला न मनी ||
विठा मुक्ता जनी | माय झाली ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

॥आध्यात्मिक अनुभव लक्षण॥
रचनाः © चंद्रहासशास्त्री सोनपेठकर
येऽनुभवास्तु वक्तव्याः नाध्यात्मिका हि ते खलु। शब्दायन्ते न ये ते हि सन्ति चाध्यात्मिकाः सदा॥ खरोखर जे अनुभव सांगणे शक्य आहे, ते आध्यात्मिक नसतातच. आणि ज्यांना शब्दबद्ध करता येत नाही, तेच अनुभव नेहमी आध्यात्मिक असतात.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

रुप रंग ढंग नहिं रहे, जड़ भय शुद्ध स्वरुप । मन मलीन दुर्वासना, सब ग्रन्थिन तम रुप ।।१९।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/१९ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : प्रकृतीतील विषय, विकार वाढत गेल्याने आत्म्याचे चैतन्यमय स्वरूप झाकले जाते आणि त्याचा सर्व स्वभाव जड मायेच्या अनुकूल होऊ लागतो. संसारातील विषय-वासनांमुळे मन मलीन होऊन ते सर्व ग्रंथींना अंधकारमय करून टाकते. मनाच्या अनुकूलच सर्व इंद्रियांचा व्यवहार होत असतो आणि आत्मा मोहावरणात आपल्या ज्ञानाला विस्मृत करून दुःखमय जीवन व्यतीत करू लागतो.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी

आजकालच्या पिढीला पुस्तकरूपी वाचन संस्कृती आवडत नाही. त्यांना मोबाईल व कंप्यूटर अशा आधुनिक साधनांचा वापर करून माहिती मिळते. पण हे या अलीकडची साधने आहेत. समर्थ तर 350/400 वर्षापूर्वी सांगून गेले आहेत की साधनमार्गाचे यथोचित वर्णन करणारे ग्रंथच माणसाला उपयोगी पडतात. ज्याला आत्मकल्याण करायचे आहेत. याने सतत अद्वैत ग्रंथाचे वाचन करावे. वाचन करण्यासाठी शांत,एकांत स्थानी जावे मनापासून ग्रंथ वाचावेत की ज्या योगे पूर्णपणे समाधान होईल. ज्या पारमार्थिक मार्गात शांती,सहिष्णुता, ऊदारता,सर्व समावेशकता हवी असते तेव्हाच अशा साधकांनी अद्वैत ग्रंथ वाचावेत. जो ग्रंथ वाचला असता साधकाचा परमार्थ वाढतो,त्याच्या अंगी अनुताप उत्पन्न होऊन मन शुद्ध होते त्याला भक्तिची साधना करावीअसे मनापासून वाटते तोच तर खरा ग्रंथ होय.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## प्रापंचिक माणसाची स्थिती कशी असते ?

आधुनिक केसरी

सर्व संतांनी भवरोगावर खात्रीचे औषध सांगितले आहे. सर्व संत आपापल्या परीने मोठेच आहेत. पण त्यांतल्या त्यांत समर्थांनी आपली जागा न सोडता, विषयी लोकांचे चित्त कुठे गुंतलेले असते हे पाहिले आणि मगच रोगाचे निदान केले. आमचा मुख्य रोग संसार दुःखाचा असून तो सुखाचा आहे असे वाटते, हा आहे. रोग कळून आला पण औषध जर घेतले नाही तर तो बरा कसा होणार ? रोग असेल तसे औषध द्यावे लागते. अजीर्णाने पोट दुखते ते भुकेने दुखते असे वाटून आम्ही अधिक खाऊ लागलो तर कसे चालेल ? संसार ज्याला दुःखाचा वाटतो त्यालाच परमार्थमार्गाचा उपयोग ! एखादा दारू पिणारा मनुष्य दारूपायी आपले सर्वस्व घालवतो. दारूचा अंमल नसतो त्या वेळी तो शुद्धीवर येतो. आणि त्याला आपल्या बायको-मुलांची काळजी वाटते. आपला प्रपंच नीट व्हावा असेही त्याला वाटते. पण त्याच्या बुद्धीला त्यातून मार्ग सुचत नाही. मग तो पुनः इतकी दारू पितो की त्यात




त्याला स्वतःचा विसर पडतो; आणि अशा रीतीने तो स्वतःचा नाश करून घेतो. अगदी याचप्रमाणे प्रापंचिक माणसाची स्थिती होते. पहिल्यापहिल्याने प्रपंच बरा वाटतो, मनुष्य त्यात रमतो. पुढे काही दिवसांनंतर तो थकतो, त्याची उमेद कमी होते, आणि म्हणून, आता आपल्या हातून परमार्थ कसा होणार असे त्याला वाटते. पण नंतर तो पुनः जोराने प्रपंच करू लागतो, आणि शेवटी हीन अवस्थेत मरून जातो. जो जगाचा घात करतो तो एका दृष्टीने बरा, कारण जग स्वतःला सांभाळून घेईल; पण जो स्वतःचा घात करून घेतो त्याला कोण सांभाळणार ? तो फार वाईट समजावा. केवळ प्रापंचिक हा असा आत्मघातकी असतो. खोटे कळूनही त्यात सुख मानून तो राहतो, आणि देवाने जे निर्माण केले ते माझ्या सुखाकरिताच केले असे समजून मरेपर्यंत त्यातच गुरफटून जातो. मनुष्य तेच तेच करीत असूनसुद्धा त्याला त्याचा कंटाळा कसा येत नाही ? कालच्या गोष्टीच आपण आज करतो. आपल्या लक्षात जरी आले नाही तरी त्या गोष्टी झालेल्याच असतात. तेच ते जेवण, ती नोकरी, तोच तो पैसा मिळविणे, सगळे तेच ! असे असताना माणसाला कंटाळा का येऊ नये ? याचे कारण असे आहे की, विषय अत्यंत गोड तरी असला पाहिजे, किंवा हावेला तृप्ती तरी नसली पाहिजे. या दोन कारणांपैकी दुसरे कारणच खरे आहे; आपली हाव पुरी झाली नाही हेच खरे आहे. विषयामध्ये सुख आहे ही आपण कल्पना केली. त्याचा अनुभव अनेक वेळा घेतला. तरी अजून आपली कल्पना ही खरी की खोटी हे आपल्याला कळत नाही, हे मात्र और आहे. जो मनुष्य प्रपंचातला आपला अनुभव जमेस धरत नाही, तो कशानेच शहाणा होत नाही.

## तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

देखोनि हरखली अंड । पुत्र जाला म्हणे रांड ॥ तंव तो जाला भांड ।
चाहाड चोर शिंदळ ॥१॥ जाय तिकडे पीडी लोकां । जोडी भांडवल
थुंका ॥ थोर जाला चुका । वर कां नाहीं घातली ॥ध्रु.॥ भूमि कांपे
त्याच्या भारें । कुंभपाकाचीं शरीरें ॥ निष्टुर उत्तरें । पापदृष्टी मळिणचित्त
॥२॥ दुराचारी तो चांडाळ । पाप सांगातें विटाळ ॥ तुका म्हणे खळ ।
म्हणोनियां निषद्धि तो ॥३॥ नेणें गाणें कंठ नाहीं हा सुस्वर । घालूं तुज
भार पांडुरंगा ॥१॥ नेणें राग वेळ काळ घात मात । तुझे पायीं चित्त ठेवीं
देवा ॥२॥ तुका म्हणे मज चाड नाहीं जना । तुज नारायणा वांचूनिया
॥३॥ माझी पाठ करा कवी । उट लावी दारोदार ॥१॥
तंव तया पारखी सिव । लाजे ठाव सांडितां ॥ध्रु.॥
उष्टावळी करूनि जमा । कुंथुनि प्रेमा आणितसे ॥२॥



शांतीब्रह्म संत एकनाथ
पान ७

आधुनिक केसरी



कर्मचाऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये..
पान ५

३

सोमवार, १३ मार्च २०२३


# साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ हिंदी साहित्यिक माधव कौशिक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** देशाच्या साहित्य क्षेत्रात अतिशय महत्त्वाच्या आणि प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ज्येष्ठ हिंदी साहित्यिक माधव कौशिक यांचा विजय झाला. या निवडणुकीत ज्येष्ठ मराठी साहित्यिक रंगनाथ पठारे पराभूत झाले. त्यांना फक्त तीन मते मिळाली. साहित्य अकादमीच्या उपाध्यक्षपदी दिल्ली विद्यापीठाच्या प्रा. कुमुद शर्मा यांची निवड झाली. साहित्य अकादमीच्या इतिहासात पहिल्यांदाच या पदावर एका महिलेची निवड झाली आहे. त्यांनी राधाकृष्णन यांचा केवळ एका मताने पराभव केला. साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदासाठी तिरंगी लढत होती. त्यात रंगनाथ पठारे यांच्यासह माधव कौशिक आणि कन्नड साहित्यिक मल्लपुरम व्यंकटेश रिंगणात होते. एकूण ९७ जणांनी मतदान केले. त्यात कौशिक यांना ६०, मल्लपुरम व्यंकटेश यांना ३५, तर पठारे यांना फक्त ३ मते मिळाली. उपाध्यक्षपदासाठी कुमुद शर्मा आणि राधाकृष्णन हे रिंगणात होते. त्यात कुमुद शर्मा विजयी झाल्या. आता माधव कौशिक हे मावळते अध्यक्ष चंद्रशेखर कम्बार यांच्याकडून पदभार



स्वीकारतील.

**पराभवाची परंपरा :** साहित्य अकादमीच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत यापूर्वी ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र नेमाडे रिगणात उतरले होते. मात्र, त्यांना चारच मते मिळाली होती. त्यांनी प्रचार करण्याकडे दुर्लक्ष केल्याने त्यांचा पराभव झाल्याचे मानले गेले. त्यामुळे यंदा पठारे यांनी जोरदार प्रचार केला. मतदारांशी संपर्क साधला होता. मात्र, तरीही त्यांना अपयश आले.

माधव कौशिक हे हरियाणातल्या भिवानीचे आहेत. त्यांचा जन्म १ नोव्हेंबर १९५४ चा. त्यांनी हिंदीत विपुल लेखन केले आहे. कौशिक यांचे आईनों के शहर में, किरण सुबह की, सपने खुली निगाहों के, हाथ सलामत रहने दो, आसमान सपनों का, नई सदी का सन्नाटा, सूरज के उगने तक, अंगारों पर नंगे पाँव, खूबसूरत है आज भी दुनिया, सारे सपने बागी हैं हे गझल संग्रह प्रसिद्ध आहेत. कौशिक यांनी सुनो राधिका, लौट आओ पार्थ या खंड-काव्याचे लेखन केले आहे. त्यांची मौसम खुले विकल्पों का, शिखर संभावना के ही नवगीतांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांचे ठीक उसी वक्त, रोशनी वाली खिडम्की हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी लहान मुलांसाठी खिलौने मिट्टी के, आओ अंबर छू लें ही पुस्तके लिहिली.



# थकित वेतनासाठी कंत्राटी कामगारांचे 'भीक मागो'

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** न. प. मधील घनकचरा व्यवस्थापनामध्ये काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांचे मागील सात महिण्यापासून वेतन थकल्याने त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. म्हणून प्रशासनाला जागे करण्यासाठी कामगारांनी शुक्रवार 10 मार्च रोजी शहरातील बाजारपेठेत प्रत्येक्ष भीक मागून आंदोलन केले. नगर परिषद मध्ये गेल्या १० ते १५ वर्षा पासून अनेक कामगार अल्पशा वेतनावर काम करत असून स्त्री-पुरुष लिंग भेद करुन कंत्राटदाराने कमी पगारावर काम घेवुन कामगारांची पिळवनुक केली. परभणी जिल्ह्यातील इतर नगर पालीकेतील सर्व कंत्राटी कामगारांना नियमीत वेतन मिळालेले आहे. परंतू जिंतूर नगर परिषदे मधील घनकचरा व्यवस्थापनेतील कंत्राटदार नांदेडला बसुन जिंतूर येथील इस्माकडून काम करुन घेत आहे. त्यात ही मागील सात महिन्यापासून वेतन न मिळाल्यामुळे सर्व कंत्राटी कामगार व त्यांचे मुले बाळे उपाशीपोटी जिवन जगत आहेत. भिकमागीतल्या शिवाय त्यांच्याकडे दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहिलेला नाही. कोणी उधार देखील देत नाही, त्यामुळे सर्वकंत्राटी कामगारांना मागील सात महिण्याचे वेतन त्वरीत देण्यात यावेत व वेतन न दिल्यामुळे संबधीत कंत्राटदार यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन कामगारांना न्याय देण्यात यावा. या आणि इतर मागण्यांसाठी मराठवाडा नगर परिषद कामगार कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अंकुश बुधवंत, सचिव सदाशिव देवकर यांच्या नेतृत्वाखाली कामगारांनी शहरातील बाजारपेठेत अक्षरशः भीक माघून आंदोलन उभे केले होते.

# नादी, टेंभी शिवारात जबरी चोरी; पन्नास हजारांचा ऐवज लंपास

## अज्ञात चोरट्यांविरुद्ध विरगाव पोलिसात गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**महालगाव :** तालुक्यातील विरगाव पोलीस ठाणे हद्दीमध्ये शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास चोरट्यांनी दोन ठिकाणी जबरी चोरी केल्याची घटना घडली आहे. यात दोन ठिकाणी झालेल्या घटनेमध्ये रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकूण 49500 रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार शनिवार दि 11 रोजी 10.30 वाजेच्या सुमारास नादी शिवारातील बेबीताई अशोक त्रिभुवन व वय 55 वर्ष राहणार नादी या आपल्या घरी असताना दोन अज्ञात चोरटे त्यांच्या घरी आले या चोरट्यांनी धारदार शस्त्राचा धाक दाखवत त्यांना व त्यांच्या पतीला त्यांच्याकडील असलेल्या धारदार शस्त्राने हाताला व पायाला जबर मारहाण केली व बेबीताई त्रिभुवन यांच्या गळ्यातील 13500 रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बळजबरीने घेऊन पसार झाले. तर दुसऱ्या घटनेत टेंभी शिवारातील गट नंबर 27 मध्ये वॉचमेन म्हणून काम करणारे कडू गंगाराम बर्डे



वय 44 वर्ष हे आपल्या पत्नीसोबत टेंभी शिवारात वॉचमेन म्हणून काम करीत असलेल्या शेतीमध्ये शनिवारी रात्री 11 वाजेच्या सुमारास त्या ठिकाणी दोन अज्ञात इसम आले त्यांनी कडू बर्डे व त्यांच्या पत्नीला धारदार शस्त्राचा धाक दाखवत त्यांच्या पत्नीच्या गळ्यातील 16 हजार रुपये किमतीचे दागिने व रोख रक्कम 20 हजार रुपये असा एकूण 36 हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने हिसकावत पसार झाले.

या घटनेची माहिती मिळताच विरगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे हे आपल्या पथकासोबत तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. जखमींना उपजिल्हा रुग्णालय वैजापूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. बेबी अशोक त्रिभुवन व कडू गंगाराम बर्डे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध जबरी चोरी केल्याप्रकरणी दोन वेगवेगळे गुन्हे विरगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले आहे.तर रविवारी सकाळी घटनास्थळी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक देखील दाखल झाले होते या प्रकरणी अधिक तपास पोलीस करीत आहे.




# ओबीसी अधिवेशनाचा कृतीयुक्त कार्यक्रम देऊन समारोप

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय पिछडा शोषित संघटनेच्या राज्यव्यापी अधिवेशनाच्या समारोप सत्रात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना शिक्षणातज्ञ रमेश बिजेकर म्हणाले की, राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 शोषित जातवर्गाच्या शिक्षणबंदीचा व जात बळकटीचा जाहीरनामा आहे. भारतीय पिछडा शोषित संघटनेच्या राज्य अधिवेशनाच्या समारोपाच्या प्रसंगीं ओबीसी नेत्या सुशीलताई मोराळे, प्रभाकर गायकवाड, सविताताई हजारे, ज्ञानेश्वर गोरे, यस जी माचनवर, कालिदास भांगे, सुदाम चिंचाने, विलास काळे, प्रबोधनकर अरविंद माळी यांची भाषणे झाली. पुढे बिजेकर म्हणाले की, समान शिक्षण पद्धती साठी संघटित पणे लढा उभारावा लागेल. विषमतावादी आशय बदलून समतावादी आशयाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. कोठारी आयोग वगळता कोणताही धोरणाने सार्वत्रिकारणाची भूमिका घेतलेली नाही. म्हणून सर्वांना शिक्षण मिळण्यासोबतच शिक्षण आशय बदलाची चळवळ उभी करावी लागेल. याप्रसंगी ओबीसी नेत्या सुशीलताई मोराळे म्हणाल्या की ओबीसींनी गाफील न राहता जागृत होऊन संघटितपणे लढा उभारावा तरच ओबीसींना न्याय मिळेल ओबीसी नेत्या सुशीलाताई मोराळे यांनी भारतीय पिछडा शोषित संघटनेच्या राज्य अधिवेशनाच्या समारोपाच्या प्रसंगी केले. एस जी माचनवर म्हणाले की महापुरुषाच्या विचार प्रत्यक्ष कृतीत आणला पाहिजे तरच ही लढाई पुढे जाईल. आपली जवाबदारी वाढलेली आहे त्यामुळे संघटितपणे संघर्ष करावा लागेल. याप्रसंगी विविध ठराव पारीत करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने भारतीय बहुजनाच्या शिक्षणाची जिथे सुरुवात झाली व ज्या महापुरुषांनी सुरुवात केली अशा फुले दांपत्याच्या नावावर पुणे शहराला फुलेनगर हे नाव देण्यात यावे. नवीन शैक्षणिक धोरण रद्द करून समान शिक्षण पद्धती लागू करण्यात यावी. ओबीसींची जात निहाय जनगणना करण्यात यावी. ओबीसींचा शासकीय व निमशासकीय नोकऱ्यातील अनुशेष तात्काळ भरण्यात यावा शिक्षक प्राध्यापक भरती केंद्रीय पद्धतीने लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात यावी. अशा अनेक ठराव पास करून यावर रस्त्यावरची व विविध पातळीवरची लढाई लढण्याचे निश्चित झाले. या ठरावाचे वाचन सुदाम चिंचाने व कालिदास भांगे यांनी केले. सूत्रसंचालन राजू पोपळघट, विलास काळे आभार देवराज दराडे यांनी मानले.डॉ वसंत हारकळ,जनार्दन कापुरे, विश्वनाथ कोकर ,राजीव पोपळघट ,रमाकांत तिडके, शरद बोरसे ,बालाजी मुंडे ,हनुमान वानकर, रामकिशन मुंडे अनेक संयोजकांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

# दुचाकीला क्रुझरची धडक; पती-पत्नी ठार

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील खामगाव येथे मुलीला





भेटण्यासाठी जाणाऱ्या पती-पत्नीचा वळण घेणाऱ्या दुचाकीला पाठीमागून आलेल्या भरजाव क्रुझर गाडीने जोराची धडक दिल्याने मोटरसायकल वरील पती-पत्नीचा जागेवरच मृत्यू झाल्याचे दुर्दैवी घटना छत्रपती संभाजीनगर जळगाव राष्ट्रीय महामार्गावरील खामगाव फाटा येथे शनिवारी घडली दगडवाडी तालुका भोकरदन जिल्हा जालना येथील वृद्ध पती पत्नी हे खामगाव गोरक्षनाथ येथे आपल्या मुलीला भेटण्यासाठी मोटरसायकल क्रमांक एम एच 19- 401ने खामगाव पाठीमागून येणाऱ्या क्रुझर गाडी क्रमांक एम एच 19 ए पी 29 88 या क्रुझर गाडीने दुचाकीला जोराची धडक दिली या अपघात इतका भयानक होता क्रुझरमध्ये अडकून दुचाकी जवळपास 30-40 फूट घासत गेले या अपघातात दुचाकी वरील दत्तू वामन बोराडे वय 65 वर्ष कमलबाई दत्तू बोराडे वय 59 वर्षे राहणार दगडवाडी तालुका भोकरदन या दोघ पती पत्नीचा जागी च मृत्यू झाला या अपघाताची माहिती मिळताच वडोद बाजार पोलीस घटनास्थळी ठेवून अपघातातील पती-पत्नी महात्मा फुले रुग्णवाहिकेतून फुलंब्री येथे ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.

## खलिस्तानींचे संकट

आधुनिक केसरी

अहमदाबाद कसोटीवर खलिस्तानी दहशतवाद्यांची बारीक नजर आहे. एका रिपोर्टनुसार, चौथ्या कसोटी सामन्यातील हल्ल्याशी संबंधित धमकीचे संदेश व्हायरल केले जात होते. खलिस्तानी दहशतवादी गुरपरवंत सिंग याने हे धमकीचे मेसेज व्हायरल केले आहेत. सामान्यादरम्यान अशांतता पसरवा, असे संदेशात म्हटले जात होते. पंजाबमध्ये खलिस्तानच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर अहमदाबाद कसोटीबाबतचा हा धोका भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठा धोका आहे. भारत-ऑस्ट्रेलिया कसोटी सामन्यात बाधा टाकण्यासाठी खलिस्तान समर्थक गटाकडून धमक्या मिळाल्याप्रकरणी अहमदाबाद गुन्हे शाखेच्या सायबर सेल युनिटला मोठा यश मिळाले. याप्रकरणी पोलिसांनी मध्य प्रदेशातून दोन आरोपींना अटक केली आहे. या धमक्या सिम बॉक्स तंत्रज्ञानाचा वापर करून दिल्या जात असल्याचे सांगण्यात येत आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज अहमदाबादमध्ये होते, तेव्हाच या धमक्या दिल्या जात होत्या. तेव्हापासून अहमदाबाद क्राइम ब्रँचचे पथक आरोपीच्या लोकेशनचा माग काढण्यात गुंतले होते. गुन्हे शाखेच्या पथकाला धमकावणाऱ्यांचे लोकेशन मध्य प्रदेश, यूपी, बिहार आणि पंजाबमधील वेगवेगळ्या ठिकाणांहून मिळत होते.यासोबतच पाकिस्तानकडून वेगवेगळ्या बनावट ट्विटर हँडलवरून धमक्याही दिल्या जात होत्या. अखेर मध्य प्रदेशातील सतना आणि रीवा येथून अवैध अदलाबदली पकडण्यात आली. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या चौथ्या कसोटी सामन्याचा आज चौथा दिवस आहे. आजचा खेळ भारतीय संघासाठी खूप महत्त्वाचा आहे. या चौथ्या कसोटी सामन्याचे पहिले तीन दिवस फलंदाजांच्या नावावर आहेत. बॉर्डर-गावसकर ट्रॉफीच्या चौथ्या आणि शेवटच्या कसोटी सामन्यात भारतीय संघ विजयासाठी जोरदार प्रयत्न करत आहे. त्यामुळेच या सामन्यादरम्यान खलिस्तानी धमकीची ही बातमी समोर आली होती. कसोटी सामना उधळण्याची धमकी देणाऱ्यांचे खलिस्तानी दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे सांगण्यात येत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, खलिस्तान समर्थक दहशतवादी गुरपरवंत सिंगच्या कार्यकर्त्यांनी अनेक धमकीचे मेसेज व्हायरल केले आहेत. धमक्या मिळाल्यानंतर गुजरात पोलिसांनी संशयितांवर कारवाई सुरू केली आहे. इसिसशी संबंध असल्याच्या संशयावरून गुजरात पोलिसांनी सौराष्ट्रात अनेकांना अटक केली आहे. यानंतर अशा घटकांमध्ये घबराट पसरली आहे. गुजरात पोलिसांच्या एटीएस, एसओजी आणि गुन्हे शाखेसह केंद्रीय सुरक्षा यंत्रणांनीही हे प्रकरण गांभीर्याने घेतले आहे.

## उच्चपदस्थ तज्ज्ञ राजीनामा का देतात ?

आधुनिक केसरी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555


**गेले काही दिवस नॅकच्या अध्यक्षांचा नाराजीनामा गाजतो आहे. त्यांनी एका वृत्त वाहिनी ला दिलेली रोखठोक, सडेतोड मुलाखत अधिक स्फोटक, विचार करायला लावणारी आहे. याचा अर्थ आपल्या कडे प्रामाणिक, स्पष्ट वक्ते, यांना काम करूच द्यायचे नाही अशी व्यवस्था आहे,जे अधिक चिंताजनक आहे. अशा घटना नव्या नाहीत.यापूर्वी आय. आय. टी., एन. आय. टी.च्या डायरेक्टर नी राजीनामे दिले आहेत,वेगवेगळ्या कारणाने. शिवाजी विद्यापीठाच्या माजी कुलगुरू नी आपल्या आत्मकथनात लिहिलेले तथ्य मनाला विषद करणारे आहे. अगदी पहिल्या दिवसापासून तर पद सोडेपर्यंत त्यांना भयानक त्रास झाला.**

अगदी त्यांच्या पत्नीच्या तब्येतीवर देखील विपरित परिणाम झाला. अशा घटना त्या त्या वेळी चर्चेत असतात. पब्लिक मेमरी अल्प काळ टिकते.काळाच्या ओघात सारे काही विसरले जाते.दुर्दैव असे की एरवी नैतिकतेच्या गप्पा मारणारा समाज देखील अशा व्यक्तीच्या पाठीशी उभा राहत नाही. सरकार, संबंधित अधिकारी, मंत्रालय देखील मजा पाहण्यात धन्यता मानते! प्रत्येकाचे हात दगडा खाली चेपले असतात. अशा वेळी फार कमी जणांना वरचा सपोर्ट मिळतो. तुमची मते तुमच्याजवळ ठेवा,तुमची समस्या तुम्हीच सोडवा अशी पळवाट शोधणारी वृत्ती बघायला मिळते.

एकीकडे सरकार, मंत्री, संबंधित पक्ष गुणवत्तेच्या, विकासाच्या, जागतिक स्पर्धेच्या, महाशक्ती होण्याच्या गप्पा मारतात. पण हे सारे कागदोपत्री, फायली पुरते मर्यादित असते. मुळात प्रश्न सोडविण्यात कुणालाच इंटरेस्ट नसतो. प्रश्न चिघळत ठेवल्याने राजकारण तापते. वादविवादाला बळ मिळते.नेत्यांना असे तापलेले,अशांत वातावरण हवे असते. हे विकृत वाटेल.पण हेच कटू सत्य आहे. नॅक अध्यक्षांनी आपल्या पत्रात, श्वेत पत्रिकेत उभे केलेले मुद्दे गंभीर आहेत. संस्थेतील, गैर प्रकार, भ्रष्टाचार, यांचे उल्लेख आहेत. त्यात नवीन काहीच नाही.हे असेच चालते हे अनेकांना माहित आहे. ते उघडे गुपित आहे. माणूस वरच्या पदावर गेला की बहुतेकांच्या तो अधिकार डोक्यात जातो. बहुतेक लोक टिकून राहण्यासाठी तडजोडी करायला शिकतात.क्वचित त्या गैर प्रकारी कारभाराच्या चिखलात रुतत जातात. आपलाही कार्यभाग साधून घेतात. त्या प्रवाहात हात धुवून घेतात. प्रश्न असतो त्या व्यवस्थेला सुधारू पाहणाऱ्या,चांगल्याची, नीतीमत्तेची चाड असणाऱ्या, प्रामाणिक व्यक्तींचा.कारण त्याच्या नशिबी एकला चलो रे ची स्थिती असते. कुणी साथ देणारे नसते. असलेच तर अल्प संख्यांक. त्यामुळे याची गळचेपी होते. नॅकच्या अध्यक्षांनी तर त्याच्या कौन्सिल चा देखील पाठिंबा मिळाला नसल्याचे विधान केले आहे. यू.जी. सी. ने त्याच्या तक्रारी, सूचना, त, श्वेत पत्रिकाना चक्क केराची टोपली दाखवली असा आरोप आहे! विशेष म्हणजे ते पूर्वी यू जी सी मध्ये व्हॉईस चेअरमन होते. त्यांना त्या संस्थेचा दीर्घ अनुभव आहे. अशा चतुरस्त्र,अनुभवी, शिक्षण तज्ञांच्या नशिबी जर हे भोग येणार असतील तर आपल्या शिक्षण व्यवस्थेचे काही खरे नाही असेच म्हणावे लागेल!

प्रश्न हा आहे की अशा वेळी, सरकार,मंत्रालय,सचिव,अधिकारी चूप का असतात? सगळ्यांचीच कातडी गेंड्याची असे कसे होऊ शकते? कुणीच आवाज उठवताना दिसत नाही. मला काय त्याचे असे कातडी बचाऊ धोरण सर्वत्र आढळते.हे देशाच्या उन्नती साठी घातक आहे.एक विचार हाही दिसतो की सुशिक्षित व्यक्तींनी राजकारणात यावे.सरकारी व्यवस्थेचा भाग व्हावे. अण्णा हजारेंच्या चळवळीचे काय झाले. आय.आय.टी. उत्तीर्ण मंत्र्यांनी, आय.ए.एस., आय.पी.एस. अधिकाऱ्यांनी राजकारणात येऊन,मंत्री,राज्यपाल होऊन काय दिवे लावले तेही गेल्या काही वर्षात आपण बघितलेच. ज्यांनी शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल केल्याचा दावा केला तेच जेल मध्ये गेले! आता खरे कोण,खोटे कोण हेच कळेनासे झाले आहे.

व्यवस्था बदलली पाहिजे, भ्रष्टाचार मुळा पासून गेला पाहिजे, गुणवत्तेचे चीज झाले पाहिजे, नैतिकता वाढली पाहिजे असे सर्वच क्षेत्रातील सर्वच लोकांना वाटते. पण नुसते वाटून काय उपयोग? त्यासाठी प्रयत्न होताना दिसत नाहीत.कुणी प्रयत्न केलेच तर साथ मिळत नाही.मग अशा परिस्थितीत विकासाचे मृगजळ कसे टिकणार, किती काळ लोभावणार? नाटकी रंगमंचावरील रंग फार काळ टिकत नाहीत. ज्यांनी



राजीनामे दिलेत, जे देतात त्या साध्या सुध्या व्यक्ती नसतात. त्यांच्या सशक्त,निर्विवाद बायोडेटा मुळेच त्या तथाकथित उच्च पदावर पोहोचल्या असतात.काही दशकांपूर्वी आय आय टी मद्रास, आताचे चेन्नई यांची पदानवती गाजली होती.आरक्षण संदर्भात त्यांनी केलेले एक विधान त्यासाठी कारणीभूत होते.आताच काही वर्षापूर्वी वैतागून आय.आय. टी. दिल्ली च्या डायरेक्टर नी राजीनामा दिला.मंत्री अन् मंत्रालयाशी मतभेद हे कारण. अनेक वर्षापूर्वी सर्व एन. आय.टी.च्या डायरेक्टर्स ना राजीनामा द्यायला सरकारने भाग पाडलं. त्यांची काही चूक नसताना.! मंत्रालयच नियुक्ती पूर्वी सब कमिटी ची मंजुरी घेण्यास विसरले होते! फक्त एक डायरेक्टर ( वी. एन. आय. टी. ),या अपमानापासून बचावले.कारण त्यांनी अंतर्गत राजकारणाला कंटाळून आधीच राजीनामा दिला होता.अशी अनेक उदाहरणे देता येतील.

वरिष्ठ मंत्री, मंत्रालय, अधिकारी,स्वतःच्या चुका सहसा कबूल करणार नाहीत. प्रतिष्ठेचा प्रश्न असतो. भुर्दंड त्या उच्च पदावरील तज्ञ, प्रामाणिक, व्यक्तीला भरावा लागतो. अशा अनेक घटनांकडे मिडियाचे देखील कधी कधी दुर्लक्ष होते.ज्या प्रमाणात प्रकरण लावून धरायला हवे त्या प्रमाणात पाठ पुरावा होत नाही. पक्षीय राजकारणाच्या इतर बातम्याना प्राधान्य मिळते. प्रामाणिक व्यक्तीच्या राजीनाम्याचा टी आर पी कमी असतो! अशा व्यक्तींना त्या त्या मूळ संस्थेचा,तेथील सहकाऱ्याचा सपोर्ट क्वचितच मिळतो. प्रत्येक जण मला काय त्याचे असे कातडी बचाऊ धोरण स्विकारतो. ही अधिकारी व्यक्ती आज आहे, उद्या नाही.आपल्याला तर इथेच राहायचे आहे. निवृत्तीपर्यंत, असा स्वार्थी विचार असतो. त्यामुळे खुर्ची वरील व्यक्तीला स्वतःचा लढा एकट्यानेच लढावा लागतो. लढणारा कितीही सशक्त असला तरी अवती भवती च्या मर्यादा असतातच.अनेकदा तर कुटुंबालाही त्रास होतो. शेवटी वैतागून तो शस्त्र खाली टाकतो. वरच्या वव्यवस्थेलही हेच हवे असते. कधी ही पिडा टळते याची सारे वाटच बघत असतात.कारण त्याच्याही अभद्र कारवायांत या व्यक्तीचा अडसर असतो! त्यामुळे अशा व्यक्ती राजीनामा देऊन गेल्या की काही जण चक्क पेढे वाटतात! फार कमी जणांना प्रामाणिक व्यक्ती मधुनच गेल्याचे दुःख होते.

जे आहे ते हे असे आहे. हे असेच चालू द्यायचे,की यात बदल करायचा, या विरुद्ध आवाज उठवायचा हे इतर कुणाच्या नाही, तुमच्या आमच्याच हातात आहे!

## सरकारी सुविधांपासून वंचित करावं ?

आधुनिक केसरी



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

**सरकारी सुविधा. ह्या सरकारी सुविधा सर्वांनाच मिळत असतात. त्या सुविधा देतांना सरकार विचारच करीत नाही की लोकांचं काय चुकतं. काही सुविधा ह्या मताचे राजकारण करण्यासाठी दिल्या जातात. सरकारी सुविधा मिळायला हव्या. परंतू कोणाला? ज्याला खरंच गरज आहे त्यांना. गरजू कोण? जे अर्ज करतात ते की जे करीत नाही ते. यात जे अर्ज करतात झोनमध्ये जावून. ते गरजू नसतातच. खरे गरजवंत लोकं ओळखण्यासाठी त्या त्या व्यक्तीच्या घरापर्यंत जावे.**

म्हणजे लक्षात येईल की तो खरंच गरजू आहे की नाही. तसं पाहता आता सर्वच जण स्वतः गरजू समजून सरकारला अर्ज करीत आहेत. सरकारनं ह्या सरकारी सुविधा त्या लोकांना द्यायला हव्या. जे अर्ज करीत नाहीत. त्यां सुविधा त्यांना त्यांच्या घरापर्यंत जावून व प्रत्यक्ष शहानिशा करुन द्यायला हव्यात. तसेच त्यांनाही द्यायला हव्यात की जी मुलं आपल्या मायबापाची सेवा करतात. आज तसा विचार केल्यास मायबापाच्या सेवेची वानवा आहे. कोणीही मायबापाची सेवा करायला पाहात नाही. धजत नाहीत. त्यांना त्रास देत असतात पदोपदी. कोणी कोणी तर त्यांना हाकलूनही देत असतात. त्यातच काहीकाही महाभाग आपल्या मायबापांना वृद्धाश्रमातही टाकत असतात. यात गरीब आणि कमी शिकलेलीच मंडळी नाही तर बऱ्याच शिकलेल्या मंडळींचाही समावेश होतो. आज ज्या वयात म्हाता-या लोकांना नातवंडासोबत खेळावंसं वाटतं. त्या वयात ती मंडळी नातूसुखापासून वंचीत होतात. म्हाताऱ्यांनाही वाटतं की आम्हाला आमच्या सुनेच्या हातची चटणी रोटी मिळावी. परंतू ती सून जेव्हा घरात येते. तेव्हा सतत भांडणं होत असतात. अशातच त्यांची रवानगी जेव्हा वृद्धाश्रमात होते. तेव्हा ते वृद्धाश्रम त्यांना एका तुरुंगापेक्षा लहान वाटत नाही. विशेष गोष्ट अशी की यामध्ये सरकार अशा वृद्धाश्रमात राहणाऱ्या लोकांना पेन्शन म्हणून पैसा देतं. वृद्धाश्रमाला अनुदान देतं. कारण की अशा वृद्धांची व्यवस्थीत सोय व्हावी. बरोबर आहे सरकारचं. वृद्धाश्रमाला हातभार लागावा म्हणून ही सोय. परंतू हे अनुदान वा ही पेन्शन त्या वृद्ध लोकांसाठी ठीक आहे. ज्यांना या जगात कोणीच नाही. ही सुविधा त्या लोकांसाठी नसावी की ज्यांना मुलबाळं आहेत. महत्वाचं सांगायचं म्हणजे ज्यांना मुलंबाळं आहेत व ज्यांनी आपलं कर्तव्य न करता आपल्या मायबापांना घरातून हाकलून दिले. त्यांच्या मुलांकडून अनुदानाचा हा पैसा व त्यांना देण्यात येणाऱ्या पेन्शनचा पैसा जबरन वसूल करावा. तसंच त्यांना कोणत्याही सुविधांचा लाभही देवू नये. असे जर झाले तर उद्या कोणताच मुलगा वा मुलगी आपल्या मायबापांना वृद्धाश्रमात टाकणार नाही वा मायबाप प्रत्यक्षपणे वृद्धाश्रमात राहायला तयार होणार नाहीत.

आज वृद्धाश्रमाची कैफियत पाहता वृद्धाश्रमाची संख्या वाढत आहे. कारण त्या मुलांनी काहीही केले तरी त्यांना माहीत आहे की त्यांचं कोणीही काही बिघडवत नाही. त्यांनी मायबापांना वृद्धाश्रमात पाठवलं तरी त्यांना कोणीही काही म्हणू शकत नाही. सरकार तर नाहीच नाही. म्हणून ते पाठवतात आपल्या मायबापांना सर्रासपणे वृद्धाश्रमात. परंतू जर यामध्ये ज्यां मुलांनी मायबापांना घरातून हाकलून दिले, त्या मुलांना मिळणाऱ्या सरकारी सुविधा बंद झाल्या आणि त्या मायबापांना मुलांनी हाकलून दिल्यावर जर त्यांना मिळणारी पेन्शनही मुलांच्याच खिशातून वसूल केली गेली तर बरीच मुलं सुधरतील व कोणीही मायबापांना हाकलून देणार नाही. वृद्धाश्रमाचीही संख्या कमी होईल. परंतू सरकारही ते ऐकत नाही व अशा मुलांना देत असलेल्या सुविधाही बंद करीत नाही.

महत्वपुर्ण वस्तुस्थिती ही की मुलांना मायबाप जन्म देतात. उन्हातून सावलीत नेतात. मोठे करतात. ते मायबाप आपले कर्तव्य पुर्ण करतात. परंतू मुलं काय करतात. ते आपले कर्तव्य विसरुन आपल्या मायबापांना घरातून हाकलून देतात. ही वास्तवता आहे. म्हणजेच ज्या काळात मुलांनी मायबापांना आधार द्यायला हवा. त्या काळात मायबापांना आधार मिळत नाही. मुलं मी आणि माझी पत्नी व माझी मुलं असा उद्देश धरुन वागतात. महत्वाचं सांगायचं म्हणजे आपल्या मायबापांनी आपल्याला वाढवलेलं असून जीवन जगण्यासाठी योग्य बनवलं आहे. तेव्हा आज म्हातारपणी मायबापांना आपल्या मदतीची गरज आहे. आपण त्यांचे काही देणे लागतो. त्यांनी तर आपले कर्तव्य केले काल. आज आपल्याला आपले कर्तव्य पार पाडायचे आहे. सरकारी सुविधा मिळो की न मिळो. कारण आपल्याला त्यांनी लहानाचे मोठे करतेवेळी सरकारी सुविधा पाहिल्या नाहीत. तेव्हा आपणही तसा विचार न करता आपल्या मायबापाची सेवा करावी. जेणेकरुन आपले मायबाप कृतार्थ होतील. जर अशी कृती आजचे पाल्य करणार नाहीत तर उद्या काळ बदलायला वेळ लागणार नाही. उद्या काळ बदलताच सरकारही तसे निर्णय घेतील. जे निर्णय प्रत्येक मुलांच्या नाकातूनच पाणी काढणारे असतील यात शंका नाही. कारण मायबाप देवापरसही मोठे आहेत. त्यांनीच आपल्याला देवधर्म आणि दानवधर्मही शिकवलेत. हे तेवढंच खरं आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# प्रा. सुरेश पुरी स्कॉलरशिपची सुरुवात


## पत्रकारितेत शिक्षण घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना होणार फायदा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** प्रा. सुरेश पुरी स्कॉलरशिपची सुरुवात झाली आहे. पत्रकारितेत शिक्षण घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. बारामती येथे मान्यवरांच्या हस्ते प्रा. सुरेश पुरी स्कॉलरशिपच्या पोस्टरचे प्रकाशन करून शुभारंभ झाल्याची घोषणा 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी केली. यामुळे पत्रकारितेत शिक्षण घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. व्हॉईस ऑफ मीडिया या पत्रकार आणि पत्रकारितेसाठी काम करणाऱ्या देशपातळीवरील संघटनेची दोन दिवसीय कार्यशाळा व चिंतन बैठक ११ व १२ मार्च रोजी बारामती येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पत्रकारितेमध्ये शिक्षण घेण्यासाठी इच्छुक असणाऱ्या युवकांसाठी "प्रा. सुरेश पुरी स्कॉलरशिप" ची घोषणा करण्यात आली. राज्यभरातून निवड करण्यात आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना ही स्कॉलरशिप देण्यात येणार आहे. ज्या पुरी सरांनी आयुष्यभर पत्रकारितेचे शिक्षण घेणाऱ्या युवकांसाठी आपले आयुष्य वेचले. त्या पुरी सरांना या निमित्ताने गुरु वंदन होणार आहे. निःस्वार्थी सेवा करा, तुम्हाला निसर्ग फळ देईल, हा गुरुमंत्र प्रा. सुरेश पुरी यांनी अनेक पत्रकारिता करणाऱ्या युवकांना दिला आहे.

**अशी होणार विद्यार्थ्यांची निवड..!**

व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने देण्यात येणाऱ्या प्रा. सुरेश पुरी स्कॉलरशिपसाठी पत्रकारितेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मागविण्यात येतील. त्यानंतर विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. या संपूर्ण प्रक्रियेतून राज्यभरातील अनेक होतकरू विद्यार्थ्यांची स्कॉलरशिपसाठी निवड करण्यात येईल. व्हॉईस ऑफ मीडियाच्या www.voiceofmedia.org संकेतस्थळावर या स्कॉलरशिप संदर्भातील निवड प्रक्रिया व इतर माहिती वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्या माहितीचा उपयोग पत्रकारितेमध्ये रुची असणाऱ्या विद्यार्थ्यांनी करावा, असे आवाहन करण्यात आले. अधिक माहितीसाठी 98674 54144 हा संपर्क नंबरही आहे.




### कोण आहेत प्रा .सुरेश पुरी ?

प्रा . सुरेश पुरी डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद आणि वृत्तपत्र विद्या विभागातून सेवानिवृत्त झाले आहेत . देशभरातील शेकडो पत्रकार, जनसंपर्क अधिकारी आणि संपादकांचे गुरू म्हणून प्रा . सुरेश पुरी यांची ख्याती आहे . अनेक विद्यार्थ्यांना स्वतःच्या मुलासारखे शिकवणाऱ्या प्रा . सुरेश पुरी यांनी अनेक माध्यमांतून सातत्याने लिखाण केले आहे . या वयातही शेकडो विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक म्हणून प्रा . सुरेश पुरी यांनी त्यांचा शिक्षकी पेशा कायम ठेवला आहे . त्यांची अनेक पुस्तके ही आहेत . इतरांना मदत करायची, त्यातून कुठलीही अपेक्षा ठेवायची नाही . आपल्या मदतीतून आपला शिष्य उभा कसा राहील याची सातत्याने काळजी घेणाऱ्या प्रा .सुरेश पुरी यांच्या नावाने व्हॉईस ऑफ मीडिया ही पत्रकारितेत शिक्षण घेऊ शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही स्कॉलरशिप सुरू करण्यात येत आहे . व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने ३ लाख रुपयांची ही स्कॉलरशिप राहणार असून निवडप्रकियेतून पात्र ठरलेल्या गरजू विद्यार्थ्यांना ही स्कॉलरशिप देण्यात येणार असल्याचे बारामतीच्या बैठकीत ठरविण्यात आले . यावेळी व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, राष्ट्रीय उपाध्यक्ष धर्मेंद्र जोरे, राष्ट्रीय सरचिटणीस चंद्रमोहन पुप्पाला, राष्ट्रीय महिला संघटक सारिका महोत्रा, प्रदेशाध्यक्ष राजा माने, नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष ( ग्रामीण ) अनिल म्हस्के पाटील, कोषाध्यक्ष चेतन बंडेवार, बालाजी मारगुडे, संजय मालाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला .

# कर्मचाऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये...



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**शेतकरी सुखी तर सर्व सुखी हे जसे तंतोतंत खरे आहे तसेच कर्मचारी सुखी तर शासन व जनता सुखी असे म्हणावयास हरकत नाही. शासन, प्रशासन, व जनता यांच्यामधील महत्वाचा दुवा म्हणजे कामगार-कर्मचारी, आणि याच वर्गावर जर नेहेमी शासनकर्त्यांसामोर आपल्या न्यायहक्कासाठी जर झोळी घेऊन कायम संघर्ष करून भीक मागण्याची वेळ येत असेल तर अशी कशी ही शासनकर्ती जमात? शासनाच्या विविध योजना व कामे रात्रंदिवस राब राब राबून एखाद्या गाढवासारखे नेहेमीच काम करून हा वर्ग जनहित साध्य करत असेल तर त्यांना व त्यांच्या कुटुंबियांससाठी कायम पेन्शनच्या रूपाने जेमतेम हक्काचे काही मिळत नसेल तर कामगार - कर्मचाऱ्यांना व कष्टकरी वर्गाला शासनकर्त्यांसमोर संघर्षशील मार्गाने आंदोलने करून आपले हक्क मिळवून घेणे हे अजिबात वावगे नाही.**

याची संवेदनशीलतेने शासनकर्त्यांनी जाण ठेवणे गरजेचे आहे अन्यथा अशा वर्गाला संप किंवा आंदोलने करून शासनकर्त्यांचे नाक दाबणे परिस्थितीनुरूप योग्य ठरते. त्यातलाच एक भाग म्हणून राज्य सरकारी कर्मचारी वर्गाने एकजूट होऊन १४ मार्च २०२३ रोजी पुकारलेला संप हे एक हत्यार म्हणावे लागेल.

अर्थशास्त्रीय दृष्ट्या राज्य शासनाची तिजोरी रिकामी होण्यास शासन अवलंबित असलेली पूर्वापार चुकीची धोरणे, सहकार क्षेत्राचा राजकारणी लोकांनी केलेला बट्ट्याबोळ, उद्योग क्षेत्राला खिरापती सारख्या वाटलेल्या मोफत योजना, बँकींग क्षेत्रातील अब्जावधी रुपयांचा भ्रष्टाचार, शासनकर्त्यासह लोकप्रतिनिधींनी केलेले करोडोंचे आर्थिक घोटाळे इत्यादी अनेक कारणास्तव राज्यशासनाची आर्थिक स्थिती डबघाईस आलेली आहे, ना की कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यांमुळे. एकंदर जमा होणाऱ्या महसुली उत्पन्नातून अल्पसा वाटा कामगार कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्त्यांवर खर्च होतो उलट जास्तीचा वाटा लोकप्रतिनिधी तथा राजकीय पुढाऱ्यांच्या वेतन भत्त्यांसह ऐशोआरामाणे जगण्यावर खर्च होतो. कामगार कर्मचारी वर्गाला त्यांनी केलेल्या कष्टाचा मोबदला म्हणजे 'वेतन'. याचा अर्थ वेतन हा हक्क असून शासनाने त्याकडे मेहेरबानी म्हणून न पाहता कामगार कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांचा व त्यांच्या उपजीविकेचा मुख्य स्रोत आहे हे लक्षात घ्यावे. पेन्शन हा कर्मचाऱ्यांचा मूलभूत हक्क असून त्यांनी बजावलेल्या सेवेचा नौकरीपश्चात मोबदला म्हणजेच पेन्शन. शासनकर्ते व लोकप्रतिनिधींनी प्रामाणिक व पारदर्शी राहून आपल्या व्हीआयपी संस्कृतीचे अनावश्यक आदरातिथ्य कमी केले तर नक्कीच यातून बचत म्हणून आर्थिक तोडगे निघू शकतात पण वर्तमान शासनकर्त्या जमातीला असे करावयाचे नाही. शासनकर्त्यांनी जनतेच्या पैशाची उधळपट्टी न करता जरा गरजेनुसार जगायला शिकले पाहिजे, शौकानुसार नव्हे तरच आर्थिक उधळपट्टी ला कुठेतरी लगाम बसेल अन्यथा समुद्रही कमीच पडेल. सन २००५ पासून शासनकर्त्यांनी शासकीय कर्मचाऱ्यांसाठी अंशादाई निवृत्ती योजना लागू करून जुनी निवृत्ती योजना बंद केल्यामुळे कर्मचारी वर्गाच्या कुटुंबियांवर मोठा आर्थिक आघात झालेला आहे. या पूर्वी अनेक वेळा शासनकर्त्यांनी कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेपोटी मिळणारे आर्थिक फायदेही बंद करून मोठाच अन्याय केलेला आहे जो नैसर्गिक न्यायहक्कांच्या विरोधात आहे. वयाची तीस-पस्तीस वर्षे शासकीय सेवेत राब राब राबवून शासनाची धेय्य धोरणे जनतेपर्यंत पोहोंचविण्याचे काम करूनही सेवा निवृत्तीनंतर तो आपल्या कुटुंबाला चार घास आनंदाचे खाऊ घालू शकत नसेल तर ही शासनकर्त्यांची मोठी चूकच म्हणावी लागेल. कुठलेही लोकप्रतिनिधी आमदार असो वा खासदार ५ वर्षे लोकप्रतिनिधी म्हणून जरी भ्रष्टाचारी मार्गाने निवडून येऊन सत्तेत बसली तरी त्यांना तहहयात विविध भरघोस भत्ते व व्हीआयपी सोई सुविधा मिळूनही दोन दोन पदांचे निवृत्ती व कुटुंब निवृत्ती वेतन मिळते याला नैसर्गिक हक्काची बाब म्हणावी काय ? देश व राज्ये कितीही कर्जबाजारी झाले तरी यांच्या व्हीआयपी सोई सुविधा व संस्कृती मध्ये अजिबात फरक पडत नसेल व जनतेच्या पैश्यावर कर्जबाजारी म्हणून आरामात पिढ्यानपिढ्या जीवन जगत असतील तर यांना जनतेचा सेवक म्हणून शेखी मिरविण्याचा अजिबात अधिकार नाही. शेवटी जनतेसह कामगार कर्मचारी व कष्टकरी वर्गाने यांना लोकहितार्थ सत्तेत जनसेवेसाठी बसविले आहे अन्यथा ही सर्वजण सर्वसामान्यांसारखीच आहेत. जनतेच्या पैश्यांवर मौजमजा मारण्यात ही जमात पटाईत असून प्रामाणिकपणे वर्षानुवर्षे जनतेची सेवा करणारा कामगार कर्मचारी वर्ग यांना दिसत नाही. अवघ्या काही क्षणातच यांचे सर्वकाही जमुन येऊन आर्थिक लाभ मिळवून घेता येतात पण कामगार कर्मचारी वर्गाला मात्र काही अत्यावश्यक असणारे देणे देण्याची वेळ आली की कर्जबाजारीपणाची आठवण येते अशी दुटप्पी वागणूक शासनकर्त्यांनी वागवू नये. वर्तमानात किती लोकप्रतिनिधी व पुढारी प्रामाणिक व पारदर्शी राहून किती प्रमाणात जनहित साध्य करतात हे आम जनतेला माहिती आहे. छोट्याछोट्या गोष्टींपासून भरमसाठ टक्केवारी घेतल्याशिवाय यांना चैन पडत नाही, एखादा सर्वसाधारण माणूस जर एकदा का लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आला की तो वर्षा दोन वर्षात कसा शेठजी बनतो हे सर्वांना माहिती आहे. रातोरात संसद व विधिमंडळात आपल्या हिताची कायदे संमत करून घेऊन आपले विशेष वेतन भत्ते मिळवून घेता येतात आणि कामगार कर्मचाऱ्यांवर काही देण्याची वेळ आली की त्यांना वाऱ्यावर सोडले जाते ही कुटनीती यांना बंद करावी लागेल अन्यथा तमाम कष्टकरी जमात रस्त्यावर उतरून यांचाही चक्काजाम केल्याशिवाय राहणार नाही. शेवटी कुणाला कुठे बसवायचे हे सर्व जनतेला पुरेपूर ठाऊक आहे. परवा आपल्या राज्याच्या लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्र्यांनी जुन्या पेन्शन योजनेबद्दल भाष्य करतांना महाराष्ट्राला आणखीनच कर्जबाजारी व्हावे लागेल असा उल्लेख करून जुन्या पेन्शन योजनेबद्दल नकारघंटा वाजवली. मी माननीय मंत्री महोदय तथा राज्याच्या वर्तमान नेतृत्वाला एक गोष्ट प्रखरपणे सांगू इच्छितो, कैक वर्षांपासून आपला संबंध महाराष्ट्रच कर्जबाजारी झालेला आहे जो कामगार वर्गाच्या पेन्शन मुळे नाही तर वेळोवेळी शासनकर्त्यांनी राबविलेल्या चुकीच्या धोरणामुळे. याला आपण एकटेच जबाबदार नाहीत. मागील वीस - पंचवीस वर्षांपासून ज्या त्या तत्कालीन शासनकर्त्यांनी चुकीची धेय्यधोरणे राबविणारी शासनकर्ती मंडळीही तेवढीकच जबाबदार आहे



जेवढे आपणही जबाबदार राहणार आहात. शेवटी राज्य व जनतेला आर्थिकदृष्ट्या कंगाल केल्याशिवाय आपण आपले भत्ते व निवृत्तिवेतन सोडणार काय ? असे होणे कदापि शक्य नाही. म्हणूनच इमानदारी व प्रामाणिकपणे जनतेची सेवा करणारी पुढारी जमात आता शिल्लक आहे कोठे ? सर्व तळागाळातील कर्मचारी - कामगार - कष्टकरी वर्गाला माझे कळकळीचे आव्हान आहे, कुठलीही जात-पात-धर्म व पदनिहायतेचा अहंकार न ठेवता दिनांक १४ मार्च २०२३ च्या राज्यव्यापी संपात सहभागी होऊन आपल्या एकजुटीचे प्रदर्शन दाखवावे. पेन्शन हा कर्मचारी व त्यांच्या कुटुंबाचा मूलभूत अधिकार असून त्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे.

'अभि नही तो कभी नही' याच एकमेव उद्देशाने हा संप यशस्वी करावा. राज्य सरकारी कर्मचारी तथा मध्यवर्ती संघटनेचा ६० वर्षांचा जाज्वल्य व संघर्षमय इतिहास हा आपल्या धेय्यांचे प्रेरणास्थान आहे. संघटनेच्या आजी माजी नेते व कर्मचारी यांच्या संघर्षामुळेच आपण वर्तमानात टिकून आहोत. या लढ्यात सर्वांनी संपूर्ण ताकदीनिशी एकत्र येऊन रस्त्यावर उतरून आपल्या एकजुटीचे प्रदर्शन घडवावे. येणारा काळ सर्वांसाठीच संघर्ष करणाऱ्या तमाम वर्गाचा आहे यात कसल्याही प्रकारचे मनात किंतु परंतु न ठेवता आपल्या न्याय हक्कासाठी सहभागी व्हा. आपल्या या लढ्यास भाकप, तथा आयटक सह माझा तन मन धनाने आपणास पूर्ण पाठिंबा. मी आपल्यातलाच एक असल्यामुळे असे सांगण्याची मला गरज नसावी पण वंचित नसूनही आपणात सहभागी होऊन समर्थन दर्शवितो. काही अपरिहार्य कारणास्तव मी उद्या आपल्या सोबत नसेल तरीही आपली लढाऊ व संघर्षमय वाटचाल, परंपरा कायम सुरू ठेवावी. मी तन मन धनाने सदैव आपल्या सोबत आहे. " डट के रहो मेरे भाईयो" तुमच्या लढ्यास मनस्वी शुभेच्छा. " जो डरते है वो कुछ करते नही, और जो कुछ करते है वो किसींसे डरते नही"चळवळीतील माझ्या अनेक मित्र परिवाराच्या प्रेरणेने हा लेख प्रपंच. तमाम कर्मचारी बंधू भगिनींनो आता पेन्शन घेतल्या शिवाय माघार नाही हा कायम निर्धार मनी ठेऊन उद्याचा राज्य व्यापी संप यशस्वी करावा ही नम्र विनंती.

**जय हिंद ।इन्कलाब जिंदाबाद।लाल सलाम ।**

# पैठणची नाथषष्ठी : संतश्रेष्ठ एकनाथ महाराज



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी


**एकनाथी भागवत असेल अथवा भारूड अशा विविध ज्ञान पुर्ण तत्वज्ञानाचे जनक मानवी जीवनातील सत्य विशाद करणार पिंगळा हे भारूड तर प्रचंड लोकप्रिय आहे . मानवी जीवनाचं तत्त्वज्ञान अगदी सोप्या भाषेत सर्व साधारण लोकांना कळेल ह्या पद्धतीने निर्माण करत महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात लोकजागृती निर्माण करण्याचं महान कार्य महाराष्ट्राच्या पावनभूमीतील पवित्र गोदावरी नदी जी दक्षिणेकडची गंगा म्हणून प्रसिद्ध आहे आणि दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या पैठण तीर्थक्षेत्री संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांचा जन्म झाला.**

जन्मानंतर आई-वडिल यांचे वैकुंठ गमन झाल्याने बालवयातील सांभाळ आजी-आजेबांनी केला. अगदी बालवयात चौकसबुद्धी, तीव्रस्मरणशक्ती आणि उत्कृष्ट अशी पाठांतरण क्षमता संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांच्या आचरणातून दिसत होती. अगदी बालवयात अध्यात्मिक गोडी व ईश्वरभक्तीची आवड असल्याने ईश्वरप्राप्ती आणि नंतर समाज उद्धार हे विचार दैनंदिन बालमनात असायचे. समाजाला मार्गदर्शन करायचे असेल तर ईश्वरप्राप्तीची प्रचिती असायला हवी ही धारणा मनोमन होती. ज्ञानप्राप्तीसाठी गुरुची नितांत आवश्यकता असल्याने आणि गुरुशिवाय आत्मज्ञान प्राप्त होणार नाही याची जाण असल्याने बालवयातच गुरुचा शोध सुरु झाला. अगदी 7 वर्षे वय असतांना गुरु शोधात निघालेले एकनाथ महाराज देवगिरीचे किल्लेदार जनार्धन स्वामी यांच्या समक्ष येवून पोहोंचले. पोहोंचल्यानंतर जनार्धनस्वामी यांना साष्टांग दंडवत घातला त्याचक्षणी जनार्धन स्वामी यांनी एकनाथ महाराज यांना उठवून जवळ घेतले. आस्थेवाईकपणे विचारपूस केली. आई-वडिलांवर रुसून हा मुलगा पळून आला असेल असाच इतरांचा समज झाला परंतु जनार्धन स्वामींना मात्र भविष्यातील उद्धारकर्ता त्यांच्यामध्ये दिसत होता आणि एकनाथ महाराज यांनी नम्रपणे सांगितले की चित्ताला अनुताप झाल्यामुळे आपण आलो आहोत. जनार्धन स्वामी हे परम दत्त भक्त होते.

दत्तात्रेय शिष्यपरंपरा ।सहस्त्रार्जुन यदु दुसरा तेणे जनार्दनु तिसरा ।शिष्य केला खरा कली युगी ॥ गुरु परंपरा आदीनारायण - ब्रह्मदेव-आत्रि-दत्तात्रेय-जनार्दनस्वामी- एकनाथ महाराज यावरुन जनार्धन स्वामी यांची महती आपल्या लक्षात येईल. याच दरम्यान चिकाटी, अभ्यासू वृत्ती, चौकसबुद्धी सदाचार आणि श्रद्धा या गुण पंचकाच्या बळावर जनार्धन स्वामी यांनी एकनाथ महाराज यांना आपले शिष्यत्व प्रदान केले. एकनाथ महाराज यांना गुरुसेवेची मुळात अतिशय आवड होती आणि ईश्वर कृपेने तशी संधी मिळाल्याने ते नियमित सेवा करु लागले. जनार्धन स्वामींच्या प्रत्येक कार्यात सहकार्य करणे आणि देवगिरी किल्ल्यावरील खटले, तक्रारी, वाटण्या, संरक्षणविषयक लोकांच्या अर्जाचे उत्तरे लिहिणे यामध्ये निपुणता प्राप्त केली आणि एकीकडे गिता , ज्ञानेश्वरी, ब्रह्मसुत्रे, उपनिषदे या ग्रंथातील ज्ञान आत्मसात करीत राहीले. जनार्धन स्वामींना आपल्या शिष्याचे कौतुक कसे करावे हे कळेनासे झाले. एकेदिवशी हिशोबामध्ये काही आणे पैशांचा घोळ आला एकनाथ महाराज यांनी आख्खी रात्र घालवली आणि तो झालेला घोळ शोधून काढला. शेवटी हिशोब बरोबर आला खूप समाधान वाटले आनंदाने किस्सा जनार्धन स्वामींना सांगितला यावर जनार्धन स्वामी यांनी एकोबा आसच मन लावून कृष्णभक्ती केलीस तर अवघे जीवन तेजानं उजळून जाईल. एकनाथांनी स्वामींचे पाय धरले. एकनाथ महाराज यांची भक्ती पाहून जनार्धन स्वामी यांनी त्यांना तपश्चर्या करण्यास सुचविले. गुरुआज्ञा शिरसावंद्य समजून देवगिरीपासून जवळ असणाऱ्या मार्कंडेय ऋषींची तपोभूमी म्हणून प्रसिद्ध आहे असे शूलभंजन नावाचा पर्वत त्या ठिकाणी एकनाथ महाराज यांनी कंदमुळे खावून 6 वर्षे प्रदिर्घ साधना केली. शेवटी जनार्धन स्वामी यांनी त्याठिकाणी येवून एकोबा तुझी आत्मसाधना सफल झाली. आता आपण बरोबरच तिर्थयात्रेला जावू असे सांगून त्या ठिकाणावरुन गुरु-शिष्य देशभर तिर्थयात्रा करुन परत आले आणि एकनाथ महाराज यांचे कार्यभूमी पैठण येथून लोकोद्धाराचे त्यांनी कार्य करावे असा उपदेश गुरु जनार्धन स्वामी यांनी केला. पैठण ही कर्मभूमी निश्चीत झाल्यानंतर नाथांनी लोकजागृतीचा श्रीगणेशा एकादशीच्या दिवशी किर्तनाने केला. एकनाथ महाराज यांचे कीर्तन प्रचंड लोकप्रिय होवू लागले. दरम्यानच्या काळामध्ये त्यांचा विवाह झाला. मुलंबाळ झाली. अध्यात्मिक आणि धामिर्क कार्य यशोशिखरावर होते. एकनाथ महाराज म्हणजे मुर्तीमंत दया, क्षमता, शांती, प्रेम, काम, क्रोध, लोभ, मोह, मध,मत्सर या सगळ्यांवर विजय मिळविलेले. दया नाथ महाराजांच्या नसानसांमध्ये भिनलेली गंगेवरुन ईश्वराला घालण्यासाठी आणलेले पाणी सुद्धा तहानेने प्रचंड व्याकूळ झालेल्या गाढवाला पाजले. प्रचंड माणुसकीचे आणि जीवा-जीवामध्ये ईश्वर असल्याचा आणि दयेचे उदाहरण लोकांसमोर ठेवणारे महाराज म्हणजे संतश्रेष्ठ एकनाथ महाराज. एकनाथ महाराज यांनी आपल्या जीवनामध्ये एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, शुकाष्टक, रुक्मिणी स्वयंवर आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांनी लिहिलेली ज्ञानेश्वरीवर लिखान केले अशा पद्धतीने अनेक ग्रंथसाहित्य अभंग एकनाथी भारुड अशी साहित्य संपदा आहे.

**पिडा हारुनी दाविला दिव्य मार्ग ।**
**जनांसाठी भूमीवरी आणी स्वर्ग ।**
**सदा सर्व लोकां गमे एक नाथ ।**
**सुरां पूज्य जो धन्य तो एकनाथ ।**

संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांच्या षष्ठीनिमित्त त्यांच्या कार्यास कोटी कोटी प्रणाम.




# शांतीजलधी एकनाथ महाराज



पंकज वसंत पाटील
मो. 9850439579

आधुनिक केसरी

**भागवत धर्माची शिकवण सहज सोप्या भाषेत तळागाळापर्यंत पोहोचवून भागवत धर्माला सुप्रतिष्ठित करणाऱ्यांत एकनाथ महाराजांचे अनन्यसाधारण स्थान आहे. एकनाथ महाराज हे संत भानुदास महाराजांचे पणतू होत. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण आणि आईचे नाव रुक्मिणीबाई होते. एकनाथांचा जन्म इ.स.१५३३ ला पैठण येथे झाला. मातापित्याचे छत्र लवकर हरवल्याने त्यांचे पालनपोषण आजी व आजोबा चक्रपाणी यांनी केले. एकनाथांनी देवगिरीवर राहून जनार्दन स्वामींची मनोभावे सेवा केली. त्यांच्याकडे अध्यात्मिक, संस्कृत शिक्षण, हिशोब, युद्धकला यांचे शिक्षण घेतले. एकनाथांनी आक्रमकांशी लढून त्यांना परतून लावल्याचा उल्लेखही आढळतो.**

जनार्दन स्वामी या विवेकी गुरूकडून नाथांसारख्या शांतीजलधिला दत्ताची उपासना लाभली होती. आपल्या गुरुघरची दत्तोपासना न स्वीकारता त्यांनीच अंगीकारण्यास सांगितलेली विठ्ठल उपासना स्वीकारून या भागवत मंदिराला आपल्या अभंगवाणीने व काव्यसंपदेने मजबूत खांबांचा आधार एकनाथांनी दिला. जनार्दन स्वामींनी एकनाथांना श्रीदत्तांचे मलंग वेषात दर्शन घडविल्याची कथा आहे. एकनाथ महाराजांच्या ग्रंथरचनेत 'दत्तमानसपूजा' व 'दत्तनाममहिमा' या विषयांवर बरेच अभंग आहेत.

गुरुकडील अध्ययन, भारताची तीर्थयात्रा संपवून २४ व्या वर्षी पैठणात परतले. १५५७ ला गिरीजाबाईंशी विवाहबद्ध झाले. त्यांची गोदा, लीला( गंगा ) आणि हरी अशी तीन अपत्ये होती. हरिपंडीत संस्कृत विद्वान लेखक होते. एकनाथ महाराजांची मुलगी गोदावरी यांचा विवाह पैठणमधील चिंतामणी मुद्‌गल यांच्याशी झाला. त्यांचा मुलगा महाभारतावर मराठी महाकाव्य करणारा मोठा कवी मुक्तेश्वर होय. पत्नी गिरीजाबाई यांनी उत्तम साथ देऊन एक्नाथांचा संसार यशस्वी केला. याचबरोबर त्यांचा सेवक उद्धव, गावबा आणि श्रीखंड्या यांचेसुद्धा नाथांच्या जीवनात अनमोल योगदान होते. भगवंत श्रीखंड्याच्या रुपात एकनाथांकडे काम करण्यास आले होते असे मानले जाते. गावबाने नाथांचे उर्वरित रामायणाचे अध्याय लिहून ते पूर्णत्वास नेले.


**श्रीज्ञानदेवें येऊनी स्वप्नात ।सांगितली मात मजलागी ॥**
**दिव्य तेजःपुंज मदनाचा पुतळा ।परब्रह्म केवळ बोलतसे ॥**
**अजानवृक्षाची मुळी कंठास लागली ।येऊनी आळंदी काढी वेगे ॥**

नाथांनी १५८३ साली ज्ञानेश्वरांच्या समाधीचा शोध घेऊन समधीस्थळावर पूजा अर्चेची वहिवाट सुरू केली. १५८४ साली ज्ञानेश्वरीचे शुद्धीकरण केले. ज्ञानेश्वर हे एकनाथ महाराजांचे आदर्श होते. एकनाथ महाराजांना ज्ञानियाचा एका म्हटल्या जाते आणि एकनाथी भागवताला ज्ञानेश्वरीच्या बरोबरीचा मान दिल्या जातो. ज्ञानेश्वरांप्रमाणेच एकनाथांनी मराठीत ग्रंथ लेखन करून देव, भक्त व नाम ही त्रयी असणाऱ्या भागवत धर्माचा जयजयकार केला आणि लोकजागृतीचे कार्य केले.

एकनाथांच्या नावावर बरेच ग्रंथ आहेत त्यापैकी नाथभागवत, रामायण व रुक्मिणीस्वयंवर हे तीन ग्रंथ विशेष विख्यात आहेत. या सर्वात जास्त भागवत हा ग्रंथ मेरुमणी आहे. नाथांच्या भागवतातील कृष्ण हा शांत व दांत उद्धवांस भक्तीच्या आनंदात निमग्न करणारा प्रेमळ परमेश्वर आहे. नाथांचे भागवत हा परमात्म्याच्या चरित्राचा एक अंश आहे. भागवतात नाथांनी साध्या, सरळ तसेच सुगम भाषेत त्यांना प्रिय असणाऱ्या गुरुभक्तीचा विस्तार विशेष केला आहे. रामायणाबद्दल सांगतांना नाथ महाराज श्रीरामचंद्रांनी माझ्याकडून हे भावार्थ रामायण लिहून घेतले असे म्हणतात.

**रामायण लिहावयासाठी ।श्रीरामें पुरणवली पाठी ।**
**श्रीराम संचरोनि पोटीं ।दाटोदाटीं लिहवीत ॥**
**करू बैसता भोजन ।ग्रासोग्रासी स्मरे रघुनंदन ।**
**मागे घालुनि जेवण ।राम रामायण स्वयें वदवी ॥**

भक्तिरस, विनोदरस, वीररसाने परिपूर्ण असलेले रुक्मिणी स्वयंवर हा त्यांचा ग्रंथ मराठी भाषेचे खास वैशिष्ट्य आहे. एकनाथांनी याशिवाय चतुःश्लोकी भागवत, हस्तामलख, स्वात्मसुख, आनंदलहरी, शुकाष्टाक, आनंदानुभव, अनुभवामृत, चिरंजीवपद अशी आठ स्फुट ग्रंथ तसेच भारुडे, गवळणी युक्त प्रचंड मोठा ग्रंथ नाथगाथा लिहला आहे. एकनाथांनी आपल्या ग्रंथात व चरित्रात दोन्ही ठिकाणी निरहंकृत भक्तीचे पालन केले म्हणूनच आज



इतक्या शतकांनंतरही एकनाथांच्या चरित्राची व कार्याची स्मृती कायम आहे.

**ब्राह्मणाचा पोर खेळिया भला ।तेणे जन खेळकर केला रे ॥**
**जनार्दन बसवंत करूनिया तेणे ।वैष्ववांचा मेळ मिळविला रे ॥**
**एकचि घाई खेळता खेळता ।आपणचि बसवंत झाला रे ॥**

असे गौरवोद्‌गार तुकाराम महाराजांनी श्रीनाथमहाराजांबद्दल आपल्या अभंगात काढले आहेत.

ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम रामदास या चार संतांच्या ज्ञानेश्वरी, भागवत, गाथा व दासबोध या चार ग्रंथांना महाराष्ट्राचे चार वेद मानण्यात येते. एकनाथ हे प्रपंच परमार्थ दोन्ही साधत होते हे विशेष. एकनाथ अतिशय शांत, सहनशील, समदृष्टी व दयाळू होते बऱ्याच संतांच्या चरित्रात चमत्कार आहेत ते साधारणांच्या आटोक्याबाहेरचे वाटतात. परंतु एकनाथांच्या आयुष्यातील शंभरवेळा थुंकणाऱ्या मुस्लिमावर न रागावणे, तहानलेल्या गाढवाला गंगाजल पाजणे, महारांना जेवू घालणे, त्यांच्याकडे जेवणास जाणे व महाराचे शेंबडे पोर कडेवर घेणे या गोष्टी चमत्कारात जमा होण्यासारख्या नाहीत. एकनाथ महाराज इतरांच्या मनाने अधिक आपुलकीचे जवळचे वाटतात याचे कारण त्यांच्या साध्या चरित्रात आहे.

संत एकनाथांनी लिहिलेले

**"माझे माहेर पंढरी। आहे भीवरेच्या तीरी ।।", "काया ही पंढरी, आत्मा हा विठ्ठल।", "ॐकार स्वरूपा, सद्‌गुरू समर्था, अनाथाच्या नाथा, तुज नमो", "गुरु परमात्मा परेशु", "रुपे सुंदर सावळा गे माये", " माझ्या मना लागो छंद गोविंद, नित्य गोविंद", "येथोनी आनंदू रे आनंदू, कृपासागर तो गोविंदू रे"**

हे काही अभंग अगदी जिव्हाग्री वसले आहेत.

त्यांचा वासुदेव लोकांना परमार्थिक जीवन जगण्याचे आवाहन खालीलप्रमाणे करतो

**कर जोडुनि विनवितो तुम्हा ।तुम्ही वासुदेव वासुदेव म्हणा ।।नको गुंतू विषयकामा ।तुम्ही आठवा मधुसूदना ।नरदेह दुर्लभ जाणा ।शत वर्षांची गणना । त्यामध्ये दुःख यातना ।तुम्ही आठवा मधुसूदना ।।नलगे तीर्थांचे भ्रमण ।नलगे दंडण मुंडण ।नलगे पंचाग्नी साधन ।तुम्ही आठवा मधुसूदना ।।हेचि माझी विनवणी । जोडितो कर दोन्ही ।शरण एका जनार्दनी ।तुम्ही वासुदेव म्हणा अनुदिनी ।।**

समाजाला शिकवण देण्यासाठी एकनाथांनी त्यांच्या काळातील प्रसार माध्यमांचे कार्य करणाऱ्या वासुदेव, जोशी बाळसंतोष, कैकाय, सरोदा, पिंगळा या समाजातील संस्थांचा उपयोग करून घेतला आहे. माळी, गारुडी, वैदु, वैदीण, फकीर, डोंबारी, कोल्हाटी, या व्यवसायिकांचाही उपयोग करून लोकरंजनातून लोकजागर करणारी भारुडे त्यांनी लिहिली. तसेच हमामा, काला, लपंडाव, पिंगा, फुगडी, भोवरा अशा खेळांमध्ये लिहलेल्या श्रुंगाररसाने परिपूर्ण असलेल्या त्यांच्या लयदार गवळणी विशेष प्रसिद्ध आहेत. भारुड म्हटले की एकनाथ महाराजांची सर्वप्रथम आठवण होते याचे कारण की त्यांच्या इतकी संख्येने विपुल व वैविध्यपूर्ण तसेच विषयांची एवढी व्यापकता व वैशिष्ट्य असलेली भारुडे दुसऱ्या कोणी लिहिली नाहीत. म्हणूनच एकनाथांची भारुडे सर्वाधिक लोकप्रिय झाली आहेत. एकनाथ महाराजांनी ३०० च्या वर भारुडे लिहिली आहेत. त्यांची उदो बोला उदो बोला, सत्वर पाव गं मला भवानी आई, आंधळ्याला पैका दे भगवान, दार उघड बये दार उघड, दादला नको गं बाई मला नवरा नको गं बाई, विंचू चावला अशी काही भारुडे आजही लोकांच्या आवडीची आहेत.

कृतार्थ जीवन जगून इ.स.१५९९ च्या फाल्गुन वद्य षष्टीला नाथांनी पैठण येथेच जलसमाधी घेतली. याच तिथीला त्यांचे गुरू जनार्दन स्वमींचा जन्म, याच तिथीला दत्तदर्शन घडले, याच तिथीला जनार्दन स्वामी समाधिस्त झाले होते आणि त्याच तिथीला एकनाथ महाराजांनी समाधी घेतल्याने फाल्गुन वद्य षष्टी अर्थात नाथषष्टीला विशेष महत्व आहे. पैठण येथे नाथषष्ठीस मोठी यात्रा भरते.

**जै धर्माची वाट मोडे I अधर्माची शीग चढे I**
**तै आम्हा येणे घडे I संसारस्थिती ॥**

नाथ महाराजांनी आपल्या शेवटच्या कीर्तनात निरुपणासाठी घेतलेला वरील अभंग त्यांच्या जीवन कार्याचा उद्देश सांगून जातो. झपाट्याने अधःपतीत होत असलेली भारतीय संस्कृती श्रीएकनाथ महाराजांच्या चरित्र चिंतनाने पुन्हा सावरेल व त्यांच्या चरित्रमूल्यांच्या आचरणाने भारतीय जीवनमुल्य पुन्हा विश्ववंद्य होईल इतकी ताकद श्रीएकनाथ महाराजांच्या चरित्रात आहे. लोकांना जे आवडते त्या माध्यमातून आध्यात्म आणि वारकरी संप्रदाय तळागाळापर्यंत पोहचवणाऱ्या महान भगवत भक्तास शत शत प्रणाम.

# भक्तीरसाने ओतप्रोत असलेली एकनाथांची अभंगवाणी



डॉ. जगदीश पाटील
संपर्क क्र.: 8149498020

आधुनिक केसरी

**भागवत सांप्रदायातील एक अद्वितीय संतकवी म्हणून संत एकनाथ महाराजांची ओळख आहे. त्यांचा जन्म इ.स. १५३२ मध्ये पैठण येथे झाला. त्यांची वंशपरंपरा भानुदास-चक्रपाणि-सूर्यनारायण-एकनाथ अशी आहे. सुप्रसिध्द संत भानुदास महाराज यांचे संत एकनाथ हे पणतू होते. त्यांचा जन्म मूळ नक्षत्रावर झाला होता. आईवडिल लहानपणीच वारल्याने त्यांचा सांभाळ आजा चक्रपाणि यांनी केला. पैठणला त्यावेळी विद्येचे माहेरघर किंबहुना संस्कृतच्या विद्येचे माहेरघर म्हणत असत. त्याचा संस्कार नाथांवर झाला. संत एकनाथ बालपणापासूनच बुध्दीमान आणि श्रध्दावान होते.**

भक्तीविषयी अगाध संस्कार - संत एकनाथांनी संपूर्ण आयुष्यभर अभंग लेखनातून व आपल्या वागणुकीतून समाजप्रबोधनाचे कार्य अखंडपणे केले. त्यांचा सर्वात मोठा गुण म्हणजे ते शांतीचा पुतळा होते. परमेश्वराची भक्ती त्यांच्या घराण्यात पूर्वीपासूनच होती. त्यामुळे भक्तीविषयीचे अगाध संस्कार नाथांवर झाले. त्यांनी आजोबांची आज्ञा न घेताच देवगडावर असणाऱ्या जनार्दन स्वामींची सेवा केली. जनार्दन स्वामींनी त्यांना प्रपंच व परमार्थ साधण्याचा किंबहुना आचरण्याचा उपदेश केला. त्यामुळेच नाथांनी लिहीलेल्या प्रत्येक अभंगाच्या शेवटी एका जनार्दनी असे वाक्य वापरलेले आपणास दिसून येईल. सहा वर्षांच्या कालावधीत जनार्दन स्वामींकडे गुरूभक्ती केल्यानंतर नाथांना भगवंताच्या सगुण भक्तीचा साक्षात्कार झाला. त्यानंतर दोघा गुरूशिष्यांनी तिर्थयात्रा केली. त्याआधी त्यांनी पंचवटी येथे जनार्दन स्वामी यांच्या आज्ञेने चतुःश्लोकी भागवतावर ओबीबध्द टिका केली. तिर्थयात्रेहून परतल्यानंतर २५व्या वर्षी ते गुरूंच्या आज्ञेने पैठणला आले व त्यांनी गृहस्थाश्रमात प्रवेश केला. त्यानंतरचे उरलेले आयुष्य त्यांनी पैठणलाच घालवून परमार्थ सेवेसाठी स्वतःला वाहून घेतले. देहाने व मनाने समाधानकारक अध्यात्मिक जीवन जगून त्यांनी शके १५२१ मध्ये फाल्गुन वद्य षष्ठीस आपला देह पैठण येथे ठेवला.

ग्रंथांमधील भक्ती - संत एकनाथांची ग्रंथसंपदा भक्तीने समृद्ध अशी आहे. त्यांच्या चतुःश्लोकी भागवत, एकादश स्कंधावरील टिका, भावार्थ रामायण, रूक्मिणी स्वयंवर, हस्तामलक, स्वात्मसुख, शुकाष्टक, आनंदलहरी, चिरंजीवपद, पौराणिक आख्याने, संतचरित्रे, अभंगरचना, पदे, भारूडे या रचनांमधून त्यांनी भागवतधर्म व भागवतभक्तीचा प्रसार करणे हेच ध्येय ठेवले. त्यामुळे त्यांच्या विविध रचनांमध्ये भक्तीचा सखोल, सविस्तर, सप्रमाण, विवेचनात्मक विचार आलेला आहे. एकनाथी भागवत या ग्रंथात तर त्यांनी भक्तीचे सविस्तर विश्लेषणच केले आहे. नाथ भागवत म्हणजे मूळ भागवताप्रमाणे भक्तीप्रधानच आहे. भक्ती, विरक्ती, प्रेमानुभव व गुरूमहिमा हा नाथभागवताचा चार पायांचा आत्माच आहे. तसेच त्याचा रसाळ व प्रसादपूर्ण आविष्कार देखील आहे.

नामभक्ती महात्म्य :- संत एकनाथांनी भगवंताच्या नामाचे दर्शन विविध अंगांनी घडविलेले आहे. त्यांनी आपल्या रचनांमधून नामाचे व नामभक्ती साधनेचे स्वरूप स्वतःच्या अनुभवाने सांगितलेले आहे. संत एकनाथांनी आयुष्यभर गुरूआज्ञेला प्रमाण मानून नामभक्तीचाच उपदेश केला. त्यांचा हरीपाठ तर संपूर्णपणे हरी या नामावरच आधारलेला आहे. हरी या शब्दापासून सुरू झालेला २५ अभंगांचा हरीपाठ हरी या नामानेच ठासून भरलेला आहे. नामाचे महत्व, नाम न घेणारा कोण असतो ? नामभक्तीचा परिणाम यासह विविध नाममहात्म्य त्यात वर्णन केलेले आहे.

**चहूं मुक्तीहूनी वरती ।उल्हास नांदे माझी भक्ती ।।**
**माझे भक्तीची अनिवार शक्ती ।तिसी मी निश्चिती आकळलो ।।**

ज्ञान, वैराग्य, निवृत्ती, धृती, शांती व ब्रह्मस्थिती यांची जननी भगवंताची भक्ती आहे. चारही मुक्तींपेक्षा ती श्रे आहे. तिची शक्ती खूप मोठी आहे. भक्तीनेच परमात्मा बांधला गेला असून त्याचे स्वरूप अनंत व अपार असूनही भगवंत हा भक्तीमध्येच गुरूफटलेला आहे, असे श्रीकृष्ण उध्दवास म्हणत असल्याचे नाथांनी भागवतात म्हटले आहे. भगवंत नेहमी भक्तांच्या दारात उभा असतो. तो भक्तीनेच बंदीस्त होऊन नेहमी भक्तांच्या अधीन असतो. भगवंतालाही भक्तीचा महिमा कळत नाही. काही लोक भक्ती करून मोक्ष, मुक्ती मागतात. परंतु जो मुक्तीची अपेक्षा न करता



उपेक्षा करून भगवंताची भक्ती करतो तोच धन्य होय. कारण जेथे भगवंताची भक्ती असेल त्याठिकाणी चारही मुक्ती पायाशी लोटांगण घालीत असतात. नाथांनी भागवतात नामभक्तीचे महात्म्य वर्णन केलेले आहे. नाम प्रक्रियेचे स्वरूप, नामाचे आविष्कार, फायदे, अडथळे, नामसाधना, योगसाधना, नामसाधनेतील पथ्ये, नाम व ध्यान, नाम व समाधी, नामाचे सगुण व निर्गुण रूप, नामाची प्राप्ती आणि नामाची फलश्रृती आदी अंगांनी नामाचे दर्शन भागवतात नाथांनी घडविलेले आहे. नामभक्तीलाच ते मोक्षावरील गुरूभक्ती म्हणतात, अशी त्यांच्या अभंगांतून नाममयता प्रकट झालेली आहे. संत एकनाथांचा भागवत ग्रंथ भगवद्भक्तीने ठासून भरल्यामुळे त्यांनी भगवंत व त्यांची भक्ती यांचेच निरूपण प्रामुख्याने केलेले आहे.

नवविधाभक्ती महात्म्य - संत एकनाथांनी त्यांच्या अभंगगाथेत भक्त प्रल्हादाने सांगितलेल्या नवविधाभक्तीपर अभंगरचनेतून भक्ती व भक्त यांचे दर्शन घडविलेले आहे. **नवविधाभक्ती नवआचरती । त्याची नामकिर्ती सांगू आता ।।नवविधाभक्ती नवजणे केली ।पूर्ण प्राप्ती जाली तयालागी ।।** भागवतप्रणित भक्त प्रल्हादाने सांगितलेली नवविधाभक्ती, भक्तीचे प्रकार, भगवंत, त्या भक्तीची वैशिष्ट्यपूर्णता, भगवंताशी अतूट संबंध आदी बाबींचा संत एकनाथ महाराज यांनी आपल्या रचनेत समावेश केला आहे. एकनाथांच्या अभंगगाथेत नवविधाभक्तीचे दर्शन घडते. श्रवण, कीर्तन, भक्तीचे महानत्व त्यांच्या अभंगात आढळते. त्यांनी सांगितलेल्या भक्तीची साधने भगवंताचे नामस्मरण व नामसंकीर्तन होय. संत एकनाथांनी फक्त नवविधाभक्तीचा पुरस्कारच केलेला नाही तर ती भक्ती स्वतः अनुभवलेली आहे. त्यांची पादसेवन भक्ती, **पायाचे चिंतन ।माझे हेचि भजन ।।चरणाची सेवा आवडी करीन ।कायावाचामन धरूनी जीवी ।।अशी होती. एवढेच नव्हे तर नाथांची दास्यभक्ती, दास्यत्वे चोखट ।रामनामे सोपी वाट ।।**

अशी समर्पित होती. अशा प्रकारे त्यांच्या अभंगातून तसेच इतर रचनांमधून त्यांनी केलेल्या नवविधाभक्तीचे दर्शन घडून येते.

# शांतीब्रह्म संत एकनाथ



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068


आधुनिक केसरी

**या सोहळ्यात अगदी प्राचीन काळापासून ते आजतागायत अनेक विभूतींनी आपल्या वैश्विक विचारांची आहुती देऊन आपापल्यापरीने समाजऋण आणि राष्ट्रऋण फेडण्याचे महत्कार्य केलेले आढळून येते. देश-मानवधर्म-लोकोद्धारासाठी अनेक महान नरवीर देशभक्तांनी रक्त सांडले, प्रसंगी आपल्या प्राणाची आहुती दिली. त्याचबरोबर अनेक समाजसुधारक, संत, विचारवंतांनी लोकोद्धारासाठी आपले अनमोल जीवन खर्ची घातले. यामध्ये महाराष्ट्रातील वारकरी संतांचे योगदान अनन्यसाधारण असून त्यात संत नामदेव, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम या चार संतांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.**

यातील प्रमुख संतांपैकी एक असणारे संतश्रेष्ठ श्री संत एकनाथ महाराजांचा वैकुंठगमन म्हणजेच जलसमाधी दिन आज फाल्गुन वद्य षष्टी या तिथीला श्री एकनाथषष्टी म्हणून साजरा केला जातो. संत बहिणाबाई आपल्या एका अभंगातून वारकरी संप्रदायाचा संक्षिप्त इतिहास कथन करतांना लिहितात

**"जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत||"**

या अभंगाचे अवलोकन केले असता संत एकनाथ महाराज म्हणजे वारकरी संप्रदायाचा मजबुत खांब आहेत. संत नामदेव-संत ज्ञानदेव या संतद्वयानंतर अडीचशे वर्षांनी संत एकनाथांनी वारकरी संप्रदायांस पुन्हा झळाळी प्राप्त करून दिली. सोळाव्या शतकांत जन्मलेले संत एकनाथ मोठे भाग्यवान संत. आत्मसन्मान राखून त्यांनी आपल्या विचारांचा प्रसार-प्रचार केला. संत एकनाथ हे एकमेव वारकरी संत आहेत जे संत-पंत-तंत या तीनही बिरुदावलीने सर्वश्रुत आहेत. लहानपणीच आई-वडील कालवश झाल्यामुळे त्यांचा सांभाळ आजी-आजोबांनी केला. परंपरेने आलेली पंढरीची वारी आणि देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, परिणामी त्यांच्यावर मूलगामी वारकरी संस्कार झाले. वयाच्या बाराव्या वर्षी देवगिरी येथील नाथ सांप्रदायिक श्रीगुरू जनार्दन स्वामीच्या सानिध्यात आले. कमी वयातच गुरुकडून नाथ सांप्रदायाच्या संस्काराबरोबरच वारकरी संस्कार होऊ लागले. लहान वयातच गायन आणि विविध धर्मग्रंथ अध्ययन-अध्यापन-पाठांतराची सवय जडली. यातूनच युवा एकनाथ भजन-कीर्तन करायला लागले. कडक शिस्त, श्रीगुरूंचा प्रभाव असल्याकारणाने महाराज सुद्धा शिस्तीत वागायला शिकले. गुरूंच्या आज्ञेवरून एकनाथ गृहस्थी झाले. गुरुची ज्ञान-धनाची श्रीमंती एकनाथांच्या संसारात आणि परमार्थात ओसंडून वाहू लागली. "नाचू कीर्तनाचे रंगी" उक्तीप्रमाणे एकनाथांना भेदाभेद मान्य नव्हते. एकनाथ महाराजांना वर्णव्यवस्था मान्य नव्हती. त्यांच्यावर पक्के वारकरी संस्कार रुजले होते. गोदावरी तटावर वसलेल्या पैठण गावात राहून एकनाथ महाराज आपला संसार आणि परमार्थ मोठ्या सन्मानाने करत होते. तहानेने व्याकूळ गाढवाला पाणी पाजणे, अनवाणी पायाने वाळवंटातील हरीजनाचे मूल उचलून कडेवर घेणे आणि शंभरवेळा यवन अंगावर थुंकूनसुद्धा एकनाथ महाराज क्रोधिष्ट झाले नाहीत. यामुळेच संत एकनाथ शांतीब्रह्म म्हणून ओळखले जाऊ लागले. संत एकनाथांनी लोकप्रबोधन करतांना स्वतःही लिहायला प्रारंभ केला. चिंतन-मनन करून अनेक महत्वपूर्ण ग्रंथ संत एकनाथांनी लिहिले. त्यातील श्री एकनाथी भागवत हा वारकरी सांप्रदायातील अग्रगण्य ग्रंथांपैकी एक मानला जातो. यातमराठी भाषेचा कैवार घेत नाथांनी "संस्कृत वाणी देवे केली ।तरी प्राकृत काय चोरापासुनि झाली ?"असा खडा सवाल करून तेथील धर्म मार्तंडांना आपल्या भक्तिज्ञानाने प्रभावित केले. त्याशिवाय विविधप्रकारचे वाङ्मय लिहून आपला ठसा जसे भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर, अभंग गाथा, चतुःश्लोकी भागवत, शुकाष्टक, हस्तामलक, स्वात्मसुख, आनंदलहरी, चिरंजीवपद,



हरिपाठ, बिरुदावली, भारुड, गवळणी इत्यादी वैविध्याने नटलेले वाङ्मय नाथांनी लिहून मराठी साहित्यास भरीव योगदान दिले आहे. संत एकनाथांचे वाङ्मय सहजतेने लोकांना रुचणारे-पचणारे असून लोकभाषेतून लोकप्रबोधन करण्याचे महान कार्य नाथांनी सोळाव्या शतकात केले. नाथांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांची भारुडे जी जीवन, राजकारण आणि कुटुंबातील दैनंदिन कैफियत लोकांसमोर ये ते. संसार, फुगडी, लग्न, होळी, गोंधळ, अभयप त्, विनंतीपत्र, ताकीदपत्र, जाबचिठ्ठी, वासूदेव, आंधळा, पांगळा, मुका, बहिरा, भुत्या, संन्यासी , जोशी, जोहार, दरवेश, गारुडी, फकीर, जोगी, विंचू, वटवाघुळ, एडका, पिंगळा आदि भारुडं हि एक वाच्यार्थ तर एक गुढार्थ आहे. त्याशिवाय संत एकनाथांच्या गवळणी खूपच आकर्षक आहेत. विशेषतः एकनाथांचा हरिपाठ रोखठोक असून "काय माय गेली होती भूतापाशी" सारख्या झणझणीत ओळी लिहून नाथ महाराज अभक्तांची कानउघडणी करतात. आज शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांचा ४२३ वा नाथषष्ठी उत्सव साजरा करतांना आपण सार्वांनीच संत एकनाथांनी घालून दिलेल्या वारकरी परंपरांची जपणूक करण्याची वेळ आली आहे. संत एकनाथ महाराजांचा

**सगुण चरित्रे परम पवित्रे सादर वर्णावी ।संज्जन वृंदे मनोभावे आधी वंदावी ।।संतसंगे अंतरंगे नाम बोलावे ।कीर्तनरंगी देवा सन्निध सुखें डोलावे ।।भक्तीज्ञाना विरहीत गोष्टी इतरा न कराव्या ।प्रेमभरे वैराग्याच्या युक्ती विवराव्या ।। जेणे करूनी मूर्ती ठसावी अंतरी श्रीहरीची ।ऐसी कीर्तन मर्यादा आहे संतांच्या घरची ।।**

या अभंगाप्रमाणे आज कीर्तन होणे काळाची गरज बनली आहे. आज कीर्तनाचा झालेला व्यापार थांबून निखळ निकं तत्व-कीर्तन करणाऱ्या उच्च शिक्षित लोकांची वारकरी संप्रदायांस नितांत गरज आहे. आज कीर्तन केवळ हसण्यासाठी, मनोरंजनासाठी झालेले पाहून ज्ञानदेव-नामदेव-एकनाथ-तुकाराम संतांची मेहनत वाया जात आहे की काय ? असा प्रश्न मनाला सतावून जात आहे. वेगवेगळे "चार्य" कीर्तनक्षेत्रात उदयाला येत असून चोखंदळ-अज्ञानी साप्ताह आयोजक लोकांकडून लाखोंच्या पट्ट्या जमा करून "हा हा ही ही" चे कार्यक्रम घडवून आणत आहेत. हे कुठंतरी थांबायला हवे. कीर्तनकारांनी व्यापार कमी करून खरे कीर्तन करून संतांची परंपरा इमानदारीने जपण्याचा प्रयत्न करावा. शिवाय काही बोटांवर मोजण्याएवढी मंडळी सोडली तर; आज एकही कीर्तनकार महाराज कविता, अभंग किंवा एखाद्या वारकरी ग्रंथांवर टीका-समीक्षण लिहित नाहीत. सगळे पोपट झालेत. कुणीच लिहित नाही. हे ही बदलले पाहिजे. अनेक विद्वजणांनी विविध धर्म ग्रंथावर सार्थ चिंतन लिहून सांप्रतकाळी लोकजागृती घडवून आणायला हवी. असे झाल्यास खऱ्या अर्थाने संतांच्या बीज-षष्ठीचा सोहळा साजरे करणे होय अन्यथा तो केवळ एक सोहळाच राहील, त्यातून नवे काहींच निष्पन्न होणार नाही. तेंव्हा मायबाप सज्जनहो, आज वाचन-लेखन-प्रसार-छपाई इत्यादी सर्व सुविधा पायांवर लोळण घेत असतांना जास्तीत जास्त उच्च शिक्षित लोकांनी अनेक संतांच्यावाङ्मयावर लिहून वर्तमानात संतांचे लेखन कसे मार्गदर्शक, उपयोगी आहे ( ? ) हे सांगावे लागेल. असे झाले म्हणजे सर्वच संतांच्या ग्रंथांना लोक पुन्हा वाचायला लागतील आणि समाजात एकोपा, सलोखा, सहिष्णुता, प्रेम, आपुलकी, जिव्हाळा इत्यादी मुल्ये रुजायला लागतील! तेंव्हाच खऱ्या अर्थाने नाथषष्ठी संपन्न झाली असे शांतीब्रह्म एकनाथांना वाटेल! ते मनोमन सुखावतील यात तिळमात्र शंका नाही! भानुदास-एकनाथ!

# पर्यावरण संतुलनासाठी वन्यजीवांच्या चारा-पाण्याची सोय करणे गरजेचे !

आधुनिक केसरी

आजच्या डिजीटल युगात सिमेंटची जंगले फोफावत आहेत. परिणामी पशु-पक्ष्यांचा निवारा संकटात आला आहे. वन्य जीवांच्या चारा-पाण्याची सोय करणे, पर्यावरण संतुलनासाठी अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या सिमेंटच्या जंगलांनी निर्सगावर आक्रमण केल्याने गावशिवारे आणि झाडेही कमी होऊ लागली आहेत. वाढत चाललेले उन्हाचे चटके, निष्पर्ण होत असलेली झाडे, झुडुपे, दुर्मीळ होत असलेले पाणीसाठे यामुळे मुक्या वन्य प्राण्याना जगविण्यासाठी कसरत



करावी लागत आहे. "पक्ष्यांसाठी घराबाहेर पाणी ठेवा' असे संदेश सोशल मीडियावर फिरू लागतात. पण संदेश पाठविणाराच पक्ष्यांसाठी पाणी ठेवत नाही, ही शोकांतिका आहे. यामुळे पशु-पक्षी कमी होऊ लागले आहेत. प्रत्येकाने जबाबदारी ओळखून चारा पाण्याची सोय करणे गरजेचे आहे जागतिक उष्णतामानात सातत्याने होणारी वाढ, हवामान आणि ऋतू बदल, दुष्काळ, पाण्याचे दुर्भिक्ष,अतिवृष्टी, पुर इत्यादी नैसर्गीक आपत्तीवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे लोकचळवळीत रुपांतर होण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक, व्यक्ती, कुंटूब यांचा सहभाग अतिशय महत्वपूर्ण, आहे यंदा उन्हाच्या झळा भाजून काढत आहेत. उन्हापासून दक्षतेचे सर्व उपाय करुनही एखादी फेरी मारल्यानंतर धडधाकट माणसाला कधी एकदा घराच्या गारव्यात जातो अशी तीव्र इच्छा होते. पोळून काढणाऱ्या कडाक्याच्या उन्हात पोटाची खळगी भरण्यासाठी व पाण्याची तहान भागवण्यासाठी पक्ष्यांची मात्र अविरत धडपड सुरु असते. या धडपडीला सुसह्य करुन त्यांच्या जिवाला थोडासा गारवा देण्यासाठी गरज आहे मूठभर धान्याची व वाटीभर पाण्याची. उन्हाच्या प्रखर झळांमध्ये पक्ष्यांची जगण्यासाठीची ससेहोलपट थांबवण्यासाठी वन्य जीवांच्या चारा-पाण्याची सोय करणे गरजेचे बनले आहे !!

**राजू जाधव, मांगूर, जि. बेळगाव**

# शिक्षणाबरोबर नैतिक मूल्य, संस्कृती, संस्कारक्षम शिक्षण असणे आवश्यक

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशाच्या प्रगतीला अधिक गती देताना शिक्षणाबरोबरच नैतिक मूल्य, संस्कृती, संस्कारक्षम शिक्षण असणे काळजी गरज आहे. असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील केले.

पनवेल येथे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या प्रमुख उपस्थिती जनार्दन भरत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट,कॉमर्स व विज्ञान महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सव समारंभ कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी जनार्दन भरत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर महाविद्यालयचे चेअरमन माजी खासदार रामशेठ ठाकूर,आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी,आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे ,जनार्दन भरत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ



भगत,उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख ,महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी इतर मान्यवर उपस्थित होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री म्हणाले, देशाच्या विकासातील उच्च शिक्षणाचे महत्व लक्षात घेऊन मा.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 तयार केले. भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. शिक्षणाची स्वायत्तता असली पाहिजे त्यानुसारच राज्यातील 144 महाविद्यालय आणि 22 विद्यापीठाला स्वायत्तता देण्यात आली आहे. शिक्षणात यापुढे 70 टक्के करियर विषयक अभ्यासक्रम आणि 30 टक्के इतर अभ्यासक्रमाचा समावेश असेल. शिक्षण आणि उद्योग याचा समनव्य ठेवून नोकरीच्या अधिक संधी उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. काही दिवसांपूर्वी विदेशातील विद्यापीठ आणि राज्यातील विद्यापीठाच्या कुलगुरूची एकत्रित परिषद राजभवन येथे झाली. अनेक विद्यार्थी आपल्या राज्यात शिक्षणासाठी येत आहेत. देशातल्या उच्च शिक्षण प्रणालीत परिवर्तनात्मक सुधारणेचा मार्ग प्रशस्त करणारे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार केले, असेही मंत्री पाटील यांनी यावेळी सांगितले.

# आदर्श शाळेची पटपडताळणी करा

## मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शहरातील बालाजी नगर येथील आदर्श



शाळेतील अनेक वर्षापासून विद्यार्थी उपस्थिती संख्या कमी आहे. रेकॉर्डवर विद्यार्थ्यांची हेराफेरी करुन शिक्षण संस्था चालवली जात आहे. यांची पटपडताळणी करून दोषीवर कारवाई करण्याची मागणी मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की परतूर शहरातील बालाजीनगर येथील आदर्श शाळा आहे. या आदर्श शाळेतील अनेक वर्षापासून विद्यार्थी उपस्थिती संख्या कमी आहे. विद्यार्थ्यांची हेराफेरी करुन हि शिक्षण संस्था शाळा चालवली जात आहे. या आदर्श शाळेत विद्यार्थ्यांची शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी नोंद आहे. ती नोंदणी आणि प्रत्यक्षात असलेलो उपस्थित संख्या यामध्ये तफावत आहे. या शाळेतील अनेक विद्यार्थी बाहेरगावी खाजगी शिक्षण घेत आहेत. परंतु आदर्श शाळेत त्या विद्यार्थ्यांच्या नोंदी घेतल्या असल्याचा आरोप केला आहे. विद्यार्थी उपस्थिती संख्या खूप कमी आहे. काही खाजगी शिकवण्या करणारे यांनी आदर्श शाळेत प्रवेश घेऊन हेराफेरी केली असल्याचा आरोप केला आहे. विद्यार्थी पट संख्या नुसार शिक्षक इतर कर्मचारी भरती केली आहे. याची पटपडताळणी करुन शिक्षक इतर कर्मचारी यांना नौकरीवरुण कमी करण्यासाठी कारवाई करुण आज पर्यंत विनाकारण खोटी विद्यार्थी संख्या दाखवून शासनाचा फुकटचा पगार घेणाऱ्या शिक्षकांना बडतर्फ करून घेतलेला पुर्ण पगार वसूल करण्यात यावा. तसेच शाळेतील विद्यार्थी संख्या बोगस दाखवून चुकीच्या पद्धतीने काम केल्याने शिक्षण संस्थाचालक यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. योग्य ती कारवाई न झाल्यास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने १४ मार्च २०२३ रोजी उपविभागीय अधिकारी परतुर यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी निवेदनात दिला आहे.



# कृषिमंत्र्यांच्या जिल्ह्यात आठवड्यात ६ आत्महत्या

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणार : खैरे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एकीकडे तरुण बेरोजगारीमुळे त्रस्त असतांना शेतकरी अस्मानी संकटात सापडला आहे. अवकाळी पावसाने दाणादाण उडल्याने शेतकऱ्यांचे गव्हु, मका, हरभरा,भाजीपाला, फळबागा आदीचे नुकसान झाले. धक्कादायक बाब म्हणजे राज्याच्या कृषी मंत्राच्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आठवड्यात ६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. एकट्या सिल्लोडमध्ये ३ जणांनी जीवन संपविले. नैतिक जबाबदारी घेत कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी केली. कन्नड तालुक्यातील पिशोर, शफेपुर, भिलदरी, आंबा, उपळा, आदी गावांत त्यांनी नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली. यावेळी उपजिल्हाप्रमुख अवचितनाना वळवले, तालुकाप्रमुख संजय मोटे, तालुका संघटक डॉ. अण्णासाहेब शिंदे, युवासेना जिल्हा समनव्यक उमेश मोकासे, उपतालुकाप्रमुख शिवाजी थेटे, सभापती अशोक दाबके, सोपान गोलाईत, गुलाब साळुंके, राजू गोलाईत, सरपंच प्रकाश जाधव, गणेश वाघ, शेतकरी योगेश मोकसे, भगवान कोठावदे, विश्वनाथ दवंगे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी दोन दिवसांपासून गंगापूर, वैजापुर, कन्नड आदी तालुक्यातील गावात भेटी दिल्या. या पिकांची त्वरित नुकसानभरपाई द्यावी, या मागणीसाठी सोमवारी १३ मार्च रोजी जिल्हाधिकारी यांना निवेदन देणार आहे.

# नारी शक्ती सन्मान; मीच होणार होम मिनिस्टर कार्यक्रमाला लक्षणीय हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**परतुर :** विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर येथे आज दि. ११ मार्च रोजी मीच होणार होम मिनिस्टर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये शाळेत असणारे मुले, मुली यांचे महिला पालक वर्गासाठी विविध खेळ व कलागुणांना वाव देणारे कार्यक्रम घेण्यात आले. छत्रपती संभाजी नगर येथील प्रसिद्ध निवेदक नितिन दिक्षित यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

तत्पूर्वी शाळेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध पोस्टर्सचे प्रदर्शन ठेवण्यात आले होते. नेहमीच्या धावपळीच्या जीवनात एक दिवस महिला पालकांना विरंगुळा मिळावा व त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून हा कार्यक्रम आयोजित केला असे प्रतिपादन विवेकानंद इंग्लिश स्कुल या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप दादा बाहेकर यांनी यावेळी केले. या कार्यक्रमात श्रीमती उषा जगदीश शिंदे ह्या माणाच्या माणकरी म्हणून पहिल्या विजेत्या ठरल्या त्यांना मानाची पैठणी बक्षीस मिळाली. तसेच श्रीमती उल्का विश्वनाथ वाघमारे व श्रीमती श्वेता दिपक शर्मा ह्या अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या विजेत्या




असून त्यांनाही मानाची पैठणी बक्षीस मिळाली. तर उत्तेजनार्थ पारितोषिकाच्या मानकरी श्रीमती ज्योती डिगांबर सुरूशे ह्या राहिल्या. महिला पालक व विद्यार्थीनी मिळून एकूण ३० जणींनी मानाची नथ मिळवली.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेचे प्राचार्य व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विषेश उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षिका श्रीमती स्वाती कोस्टा मॅडम व वर्ग ०८ वी व ०९ वी च्या विद्यार्थ्यींनींचा यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती. संगीता शिंदे व प्रमुख पाहुण्या श्रीमती. रोडगे मॅडम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# समृद्धी महामार्गावर अपघातात सहा प्रवाशांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** समृद्धी महामार्गावर नुकताच लोकार्पण झालेला समृद्धी महामार्ग सातत्याने अपघातांमुळे चर्चेत आहे. रविवारी ( आज, १२ मार्च ) सकाळी या महामार्गावर एका कारचा भीषण अपघात झाला. या अपघातात कारमधील ६ प्रवासी जागीच ठार झाले आहेत. तर सात प्रवासी गंभीर जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बुलडाण्यातील मेहकरजवळ भरदाव कार उलटून हा अपघात झाला आहे. मारुती सुझुकी अर्टिगा कारमधून १३ प्रवासी प्रवास करत होते. यापैकी सहा प्रवासी जागीच ठार झाले आहेत. तर सात प्रवासी जखमी आहेत. मृतांमध्ये चार महिला, एक लहान मूल आणि चालकाचा समावेश आहे. दरम्यान, अपघातग्रस्तांना तातडीने मदत न मिळाल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. सकाळी ७.५५ वाजता लोणार तालुक्यातील मेहकरजवळ हा अपघात झाला. अर्टिगा कारमधून १३ जण प्रवास करत होते. ही कार उलटून अपघात झाला. अपघातानंतर पाऊण तास अपघातग्रस्तांना कोणतीही शासकीय मदत मिळाली नाही. त्यानंतर अधिकारी तिथे दाखल झाल्यावर त्यांनी गावकऱ्यांनाच दमदाटी केली. हा बुलडाण्यात समृद्धी महामार्गावर झालेला आतापर्यंतचा ४० वा अपघात आहे. अपघातानंतर पाऊण तास क्विक रिस्पॉन्स टीम किंवा इतर कुठलीही शासकीय यंत्रणा अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी पोहोचली नसल्याचे स्थानिकांनी सांगितले. आता समृद्धी महामार्गावरील अपघात रोखण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना केल्या जातायत याकडे लक्ष असेल.

# विविध क्षेत्रात ठसा उमटविणाऱ्या नारीशक्तीचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहरातील रुक्मिणी नगरात जागतिक महिला दिनाचे औचित्य ( ता.८ मार्च ) साधतं विविध क्षेत्रात आपल्या क्षमतेने ठसा उमठविणाऱ्या नारीशक्तिचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी डॉ.स्वाती टोंगे, प्रा. वसुंधरा, विधीतज्ञ ऍ़ड. पूजा चव्हाण, मीना नलवार,पल्लवी कामीनवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमासाठी माँ जिजाऊच्या वेशभूषेत लहान लहान मुली सामील झाल्या होत्या तर झाशीची राणी - आराध्या द्रोणावर,राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू - श्रावणी गोपतवाड , अहिल्याबाई होळकर - विक्रम विखाणे , सोनाक्षी सुरकुंबेवार यांनी सावित्रीबाई फुलेंची वेशभूषा परिधान केली होती. तर परी के. सुप्रिया तांबके, श्रेया साताबाहे वैष्णवी जाधव जिजाऊ यांची भूमिका सकारून कार्यक्रमाला चुमुकलीने चार चांद लावले आहे. वेशभूषेतील मुलींनी तबला वादन सादर केला. ह्या सर्व चिमुकल्या सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या. त्यानंतर डॉ. स्वाती टोंगे यांनी महिलांशी निगडित आरोग्य क्षेत्रातील समस्यावर,प्रा. वसुंधरा मॅडम शैक्षणिक क्षेत्रातील युवतीना असलेल्या संधीवर,ऍ़ड.पूजा चव्हाण यांनी, हुंडा प्रतिबंधक कायदा, बालविवाह प्रतिबंधक कायदा, महिला संरक्षण कायदा, घरगुती छळ,अश्लीलता विरोधी कायदा, कौटुंबिक न्यायालय कायदा, छळ प्रतिबंधक कायदा, वेतन कायदा, लैंगिक गुन्हे, हिंदू उत्तराधिकार कायदा, हिंदू विवाह कायदा, मातृत्व लाभ कायदा, तसेच प्रत्येक जिल्ह्यात महिलांचे शोषण आणि छळ रोखण्यासाठी उच्च न्यायालयाचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महिला सहाय्यता समिती स्थापन करण्याबाबत माहिती दिली. तसेच एसबीआय बँकेच्या रोखपाल पल्लवी कामीनवार यांनी बँकिंग व्यवहार स्त्रियांनी कसे करावे व त्याचे महत्व या संदर्भात मार्गदर्शन केले. या महिला दिनाचे सूत्रसंचालन संगीता दरबस्तेवार यांनी केले तर आभार प्रदर्शन अंजली संतोष कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाला महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



८ मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो . या निमित्ताने नारीशक्तिचा सन्मान केला जातो . आजही विधवा महिलांना शुभ कार्यात बोलवले जात नाही . आम्ही रुक्मिणी नगरमध्ये हा दिन साजरा करताना उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवून विविध क्षेत्रात कार्यरत महिलांचा सन्मान केला .दर वर्षी महिलांसाठी वेगवेगळे कार्यक्रम करणार व महिलांना जागृत असा आमचा संकल्प आहे . **रंजना मारोती जाधव**

# हिंदू धर्म रक्षणासाठी व्होट बँक सक्षम करणे हाच पर्याय

## कालीचरण महाराज : शिवसमर्थ प्रतिष्ठानतर्फे शिवजयंतीनिमित्त हिंदू धर्मजागरण सभा

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** हिंदू धर्माच्या हितासाठी व्होट बँक हाच अंतिम पर्याय असून, त्यासाठी राजकारणाचे हिंदूकरण करणे अत्यावश्यक आहे. धर्माचे हित साधणारा साधू असतो आणि मला तेच काम करायचे आहे. त्यामुळे हिंदू धर्मियांनी एकत्र येऊन धर्म रक्षणासाठी काम करावे, असे प्रतिपादन कालीपूत्र कालीचरण महाराज यांनी केले. सभेच्या सुरुवातीला कालीचरण महाराज यांनी आपल्या खड्या आवाजात शिवतांडव स्तोत्र म्हणत उपस्थितांची मने जिंकली.

शिवसमर्थ प्रतिष्ठानतर्फे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आयोजित धर्मजागरण सभेत कालीचरण महाराज बोलत होते. सनसिटी, सिंहगड रोड येथे झालेल्या सभेवेळी शिवसमर्थ प्रतिष्ठानचे संस्थापक दीपक नागपुरे, अध्यक्षा मंजुषा नागपुरे, भारतीय जनता पक्ष पुणे शहर संघटन सरचिटणीस राजेश पांडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. कालीचरण महाराज म्हणाले, "इस्लाम हेच हिंदूंवरील मोठे संकट आहे. लव्ह जिहाद, लोकसंख्या जिहाद, बदनामी जिहाद, लँड जिहाद, युपीएससी जिहाद या माध्यमातून इस्लाम आपले हातपाय वेगाने पसरत आहे. पण हिंदू मात्र वर्णवाद, भाषावाद, प्रांतवाद, जातीवाद या बुरसटलेल्या गोष्टींमध्ये अडकून स्वतःचे विभाजन करीत बसला आहे. ही परिस्थिती बदलायची असेल तर आताच जागे होणे गरजेचे आहे.

सनातन हिंदू धर्म हा जगातील एकमेव धर्म असून त्याची ईश्वरप्राप्तीचे ध्येय, पुनर्जन्मसिद्धांत आणि कर्मफलसिद्धांत ही तीन लक्षणे आहेत. या धर्माचे ध्येय साधण्याचे शैव, वैष्णव, शाक्त, जैन, बौद्ध आणि शीख हे सहा मार्ग आहेत. परंतु इस्लाम आणि ख्रिश्चन हे धर्मच नाहीत कारण त्यांच्याकडे हिंदू धर्माच्या लक्षणांपैकी एकही लक्षण अस्तित्वात नाही," असे परखड मतही कालीचरण महाराज यांनी व्यक्त केले. कालीचरण महाराजांनी सरकारी जनगणनेच्या आकडेवारीवर आक्षेप घेत सांगितले की, दररोज देशात ६५ हजार मुले जन्माला येतात. त्यापैकी ४० हजार मुले ही मुस्लिम आहेत. या वेगाने विचार केला तर वर्षाला मुस्लिमांची लोकसंख्या १ कोटी ४४ लाख इतकी वाढणार आहे. या वेगाचा विचार केल्यास लवकरच ते हिंदूंवर हावी होतील आणि भारताला इस्लामिक देश बनवून टाकतील. यावेळी हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते शरदभाऊ मोहोळ आणि स्वातीताई मोहोळ यांना शिवसमर्थ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच सोशल मीडियावर हिंदुत्वाची बाजू मांडणारे पियुष कश्यप, चंद्रभूषण जोशी, उमेश खंडेलवाल, अमोल पवळे, राहुल चंदेल, ऋषिकेश मळेकर यांना सोशल मीडिया वॉरियर्स म्हणून गौरविण्यात आले. मंजुषा नागपुरे यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. शिवव्याख्याते निलेश भिसे यांनी सूत्रसंचालन केले. दीपक नागपुरे यांनी आभार मानले.







# पळसाची पत्रावळी इतिहासजमा

## कागदी आणि थर्माकोलच्या पत्रावळीला वाढती मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** लग्न असो,वा कुठल्याही धार्मिक कार्यक्रम असो त्यासाठी पंगतीला पत्रावळ असणे आवश्यक आहेत. पूर्वी पानाच्या पत्रावळी, द्रोणाशिवाय पंगती होत नसत. मात्र, आता सर्वत्र आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून यंत्राच्या सहाय्याने प्लॅस्टिक व थर्माकोल पत्रावळी द्रोण ग्लास, चहाकप बनविले जाऊ लागले आहेत

या पत्रावळी व द्रोण कमी भावात उपलब्ध होत असल्याने आणि त्याची फॅशन असल्याने पानांपासून बनविलेल्या पत्रावळी-द्रोण



कालबाह्य होत असल्याचे चित्र ग्रामीण भागासह शहरातही दिसून येत आहे. मोहाच्या व पळसाच्या पानांपासून पत्रावळी व द्रोण बनवल्या जात. या पत्रावळीत केलेले जेवण लोकांना स्वादिष्ट व चवदार वाटायचे. सकाळी जंगलात जाऊन पाने तोडून आणायची आणि मग दुपारी त्यापासून कुटुंबातील लहान-मोठ्यांना पत्रावळी बनविण्याचे काम मिळायचे. एक व्यक्ती १०० ते २०० पत्रावळी दिवसभर बनवीत असे. त्यामुळे त्यांना चांगला मोबदला ही मिळायचा, मात्र यासाठी मेहनत खूप घ्यावी लागत असे. त्यासाठी वेळसुद्धा भरपूर लागायचा. पत्रावळी बनवून अनेक कुटुंबे यावर उदरनिर्वाह चालवीत असत. पत्रावळी बनवून थेट शहरातील बाजारात विकल्या जात असत. त्यामुळे अनेक कुटुंबांना रोजगार मिळत असे. आता यंत्राद्वारे प्लॅस्टिकच्या पत्रावळी व द्रोण अत्यंत कमी वेळात, कमी किमतीत, तसेच विविध रंगांत उपलब्ध होतात. कागद व प्लॅस्टिकच्या पर्यायात उपलब्ध होत असल्याने यांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे पत्रावळी बनवून आपला प्रपंच चालविणाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. तर काहींना इतर व्यवसायांकडे वळावे लागले आहे. तरीही आज शहरातच नव्हे, तर ग्रामीण भागातसुद्धा पानाच्या पत्रावळी दिसून येत नाही. त्या आता इतिहासात जमा होण्याच्या मार्गावर आहेत.

# वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याला दुचाकीस्वाराची मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एका वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण केल्याची घटना घडली आहे. वाहतुकीचे नियम मोडल्यावर एका वाहनचालकाची चौकशी करत असताना ही घटना घडली आहे. वाहतूक पोलीस हवालदाराला मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी कुर्ला पोलिसांनी एका 53 वर्षीय व्यक्तीला अटक केली आहे.

या घटनेचा व्हिडीओ देखील समोर आला आहे. ज्यामध्ये एक व्यक्ती वाहतूक पोलिसाला मारहाण करत असल्याचं स्पष्ट दिसत आहे. तसेच पोलीस हवालदाराला मारहाण होत असताना तिथे मोठ्या प्रमाणात बघ्यांची गर्दी देखील जमलेली दिसत आहे. हा व्हिडीओ आता सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. अनेक लोक पोलिसाला मारहाण केल्याचा हा व्हिडीओ पाहून संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना कुर्ला ( पश्चिम ) डेपो सिग्नल जवळ घडली आहे. खालीद इसाक वसईकर ( वय 53 ) याने स्कूटर चालवत असताना सिग्नल तोडून पळून जात होता. मात्र त्याला वाहतूक हवालदारने पकडले आणि याबाबत चौकशी करत असताना खालीद याने त्यांना धक्काबुक्की करून शिवीगाळ केली. त्यावेळी खालीद याने आरडाओरडा करून लोकांची गर्दी जमवली. यातच घटनास्थळी गर्दीतून इतर दोन अनोळखी व्यक्तींनी वाहतूक पोलिसाला धक्काबुक्की केली आणि एकाने पोलीस हवालदाराच्या कानशिलात लगावत धमकी दिली. हा सर्व प्रकार कॅमेरात कैद झाला असून याप्रकरणी कुर्ला पोलिस ठाण्यात कलम 353, 332, 504, 506, 34 भादवि प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



# आईच्या स्मरणार्थ अडराईट प्रोजेक्टर भेट

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** तालुका खुलताबाद येथील जिल्हा परिषद हायस्कूल हे संपूर्ण राज्यात 17 शाळांपैकी एक आदर्श शाळा म्हणून घोषित असल्याने व जिल्हा परिषद ची आदर्श शिक्षण संस्था असल्याने दानशूर व्यक्ती गणेश जोशी यांनी स्वतःच्या कैलासवासी मातोश्री मालती मधुकर जोशी यांच्या स्मरणार्थ अडराईट प्रोजेक्टर सप्रेम भेट दिला मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे यांनी तो स्वीकारला असून ग्रामीण भागातील मुलींना याचा नक्कीच फायदा होईल असे आश्वासन दिले. सप्रेम भेट मिळालेल्या वस्तूने पालक विद्यार्थी शिक्षक यांनी दानशूर व्यक्तीचे अभिनंदन केले आहे

# जिंतूर येथील चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने निबंध स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतुर :** जिंतूर विकास चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने जिंतूर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून ही निबंध स्पर्धा आगळ्यावेगळ्या विषयांमुळे आणि रोख पारितोषिकांमुळे चर्चेत आली आहे. या स्तुत्य उपक्रमामुळे जिंतूर तालुक्याच्या भौगोलिक व ऐतिहासिक स्थितीला उजाळा मिळत असून जिंतूरकर उज्वल भविष्याची स्वप्ने पाहत जुन्या आठवणींमध्ये रममाण झाले आहेत. या स्पर्धेचे पहिले पारितोषिक रू. 5000/-, द्वितीय रू. 4000/-, तृतीय रू. 3000/-, चतुर्थ रू. 2000/- आणि पाचवे रू. 1000/- असे असून निबंध स्पर्धेचे विषय माझ्या स्वप्नातील जिंतूर तालुका, जिंतूर तालुकाः काल, आज, उद्या, जिंतूर तालुकाः जल, जमीन आणि जंगल यांचा सदुपयोग, जिंतूर तालुकाः कला, संस्कृती आणि साहित्य क्षेत्रातील प्रगती , जिंतूर तालुक्यात रोजगार निर्मितीसाठी करावयाचे प्रयत्न , जिंतूर तालुक्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीसाठी करावयाचे प्रयत्न , जिंतूर तालुका आदर्श तालुका कसा होईल असे आहेत. या निबंध स्पर्धेसाठी जिंतूर तालुक्यातील गावागावातून निबंध पाठवले जात असून वयाचे व शब्दांचे बंधन नसल्यामुळे लहान थोर अशी सर्वच मंडळी हिरीरीने सहभागी होत आहे. या निबंध स्पर्धेबाबत प्रसिद्ध झालेल्या पत्रकातील मजकुरानुसार निबंध पाठवण्याची अंतिम तारीख 31 मार्च 2023 असून निकाल 10 एप्रिल 2023 रोजी घोषित करण्यात येणार आहे. निबंध हा हाताने लिहून वा टाईप करून सॉफ्टकॉपी 9930096954 या क्रमांकावर व्हाट्सअॅप करावी किंवा हार्डकॉपी अॅड. सुनिल शिवाजीराव बुधवंत, अध्यक्ष, जिंतूर विकास चॅरिटेबल ट्रस्ट, शिवालय, शिवाजीनगर, जिंतूर, या पत्त्यावर पाठवावी.

जिंतूर तालुका आदर्श तालुका होण्यासाठीची चर्चा घराघरात व्हावी तसेच जेष्ठ मंडळींकडून त्यांचे अनुभव, त्यांनी जगलेले जीवन नवीन पिढीला माहिती व्हावे व येणाऱ्या पिढीने इतिहासाकडे बघत व शिकत जिंतूरच्या सर्वांगीण भविष्याला काळानुरूप योग्य तो आकार द्यावा या आशेने आणि जिंतूर तालुक्यात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागून एक जबाबदार पिढी तयार व्हावी या अपेक्षेने जिंतूर निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे. या निबंध स्पर्धेसाठी आलेल्या उत्तमोत्तम निबंधांचे संकलन करून एक पुस्तक सुद्धा प्रकाशित करण्यात येणार आहे. अशी माहिती जिंतूर विकास चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष अॅड. सुनिल शिवाजीराव बुधवंत यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.




## क्राईम जगत

### संशयास्पद अवस्थेत आढळला मृतदेह

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा :** पत्नी मुलांना भेटण्यासाठी गेलेली असताना हट्टी येथील रहिवासी सुखदेव खंडागळे ( वय ४६ ) यांचा घरातच संशयास्पद अवस्थेत मृतदेह शनिवारी ( दि.११ ) आढळून आला. मयत सुखदेव खंडागळे यांनी आत्महत्या केली की त्यांचा घातपात करण्यात आला याचा शोध अजिंठा पोलिस घेत आहेत. मयत सुखदेव खंडागळे यांच्या पत्नी छत्रपती संभाजीनगर येथील कंपनीत काम करीत असलेल्या दोन्ही मुलांना भेटण्यासाठी गेल्या होत्या. त्यामुळे मुलांनी सुखदेव खंडागळे यांना फोन केला असता ते फोन घेत नव्हते. त्यामुळे मुलांनी शेजाऱ्यांना संपर्क साधून त्यांना पाहण्यास सांगितले होते. शेजाऱ्यांनी खंडागळे यांच्या घरात जावून बघीतले असता ते बेशुध्दावस्थेत पडून होते. या घटनेची माहिती मिळाल्यावर उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विजय मराठे, सहाय्यक निरीक्षक प्रमोद भिंगारे, उपनिरीक्षक राजू राठोड, विकास चौधरी, निलेश शिरस्कर, अरुण गाडेकर, संजय ब्राम्हदे आदींनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करून मृतदेह शविच्छेदनासाठी सिल्लोड उपजिल्हा रुग्णालयात पाठविले आहे. याप्रकरणी अजिंठा ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद घेण्यात आली.

### जीपच्या धडकेत वृद्ध दांपत्य ठार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** खामगाव फाटा येथे वळण घेत असलेल्या दुचाकीला पाठीमागून भरधाव वेगाने आलेल्या जीपने दिलेल्या धडकेत वृद्ध पती -पत्नी जागीच ठार झाले. अपघाताची ही घटना शनिवारी ( दि ११ ) सकाळी साडे नऊ वाजेच्या सुमारास घडली. दत्तू वामन बोराडे ( वय ६५ ) व त्यांची पत्नी कमलबाई दत्तू बोराडे ( वय ६०, रा.दगडवाडी. ता.भोकरदन,जि.जालना ) असे अपघातात मृत झालेल्या वृध्द दांम्पत्याचे नाव आहे. अपघातात ठार झालेले वृध्द बोराडे दांम्पत्य फुलंब्री तालुक्यातील खामगाव येथे मुलीला भेटण्यासाठी दुचाकीवर जात होते. छत्रपती संभाजीनगर ते जळगाव रोडवरील खामगाव फाट्याजवळून वळण घेत असतांना पाठीमागून आलेल्या जीप क्रमांक ( एमएच-१९-एपी-२९८८ ) ने बोराडे यांच्या दुचाकीस धडक दिली. अपघातानंतर बोराडे दांम्पत्यास ३० फुटापर्यंत फरफटत नेल्याने दोघांचे देह छिन्नविच्छन्न झाले होते. मयत बोराडे दांम्पत्यावर दुपारी ४ वाजता दगडवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. या अपघाताची नोंद वडोद बाजार पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

### गांजा विक्री करणाऱ्या दोघांना पकडले

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अवैधरित्या गांजाचा साठा करून विक्री करणाऱ्या दोन जणांवर अंमली पदार्थ विरोधी विशेष पथकाने कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी दोघांच्या ताब्यातून १३ हजार ४८० रूपये किंमतीचा ६७४ ग्रॅम गांजा आणि रोख रक्कम असा एकूण १९ हजार ३८० रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला असल्याची माहिती गुन्हेशाखेचे निरीक्षक अविनाश आघाव यांनी कळविली आहे.

नुतन कॉलनी परिसरातील अजब नगर कमानीजवळ सय्यद आरेफ सय्यद मोहम्मद अली ( वय ७२,रा.बिसमिल्ला कॉलनी, टाऊनहॉल ) व जावेद खान आयुब खान ( वय २१,रा.नुतन कॉलनी ) हे दोघे गांजाचा साठा करून खरेदी-विक्री करीत असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी विशेष पथकाला मिळाली होती. पोलिस उपायुक्त अपर्णा गिते, गुन्हेशाखेचे निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली अमंली पदार्थ विरोधी विशेष पथकाने ९ मार्च रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास अजबनगर कमानीजवळ सापळा रचून गांजाची खरेदी विक्री करणाऱ्या सय्यद आरेफ सय्यद मोहम्मद अली व जावेद खान आयुब खान यांना ताब्यात घेतले. अंमली पदार्थ विरोधी विशेष पथकाचे पोलिस अंमलदार सुनील पवार यांनी दिलेल्या तक्रारीवरून गांजाची खरेदी-विक्री करणाऱ्याविरूध्द क्रांतीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक इंगळे करीत आहेत.

# काचबिंदू जागृतीसाठी सायकल रॅली

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** जागतिक काचबिंदू सप्ताहाचे औचित्य साधून पुण्यातील मुलानी आय केअर सेंटरच्या वतीने काचबिंदू जागृतीसाठी सायकल रॅलीचे आयोजन केले होते. लष्कर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम व ज्येष्ठ नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. अशोक मुलानी यांच्या हस्ते फ्लॅग ऑफ करून रॅलीला सुरुवात झाली. सेंटरच्या प्रमुख आणि नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. समिता मूलानी-कटारा यांच्या नेतृत्वात ही सायकल रॅली एमजी रस्ता, कॅम्प, आंबेडकर, पूना लेडीज क्लब, पुलगेट आदी भागात काढण्यात आली. मुलानी आय केअर सेंटरचे डॉक्टर्स, कर्मचारी, स्वयंसेवक, विद्यार्थी, तसेच लष्कर पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी या सायकल रॅलीमध्ये सहभागी झाले होते. जवळपास ५५ सायकलस्वारांनी काचबिंदूबाबत जागृतीपर घोषणा देत, पॅम्प्लेट वाटत नियमित डोळ्यांची तपासणी करण्याचे आवाहन केले. तसेच मुलानी आय केअर सेंटरतर्फे १३ मार्च २०२३ रोजी दुपारी ३ वाजल्यापासून एमजी रस्त्यावरील मुलानी आय केअर सेंटरमध्ये आयोजिलेल्या मोफत काचबिंदू तपासणी शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन केले. डॉ. समिता मुलानी-कटारा म्हणाल्या, "यंदा १२ ते १८ मार्च २०२३ या कालावधीत जागतिक काचबिंदू सप्ताह राबविण्यात येत आहे. काचबिंदू तपासणी आणि जनजागृती करण्यासाठी मुलानी आय केअर सेंटरच्या वतीने ही सायकल रॅली काढण्यात आली. आज काचबिंदूमुळे अनेक लोकांना अंधत्व आले आहे. भारतात कोट्यवधी लोक काचबिंदूने ग्रासलेले आहेत. पण योग्य काळजी आणि उपचार घेतले तर काचबिंदूसारख्या आजारांना आपण दूर ठेवू शकतो. काचबिंदूची तपासणी नेत्ररोग तज्ज्ञांच्या निगराणीखाली व्हायला हवी.

## मिशन पाच पाटील टीम व जेसीबी मिशन सहकार्याने जलबचतीच्या कामांना शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील खांडी पिंपळगाव वडोद खुर्द सुलतानपुर / भांडेगाव मिशन ५०० पाच पाहिल व टिम व क्रेडाई पुणे यांच्या जेसीबी मशीन सहकार्यले ४/3/2023 रोजी जलवाचताचे कामाना शुभारंभ झाला यामध्ये नाल रुंदीकरण व खोलीकरण गाळ काडने व बांध बांधणे यावेळी उद्‌घाटन प्रमुख अतिथी निंबाळकर सर यांच्या हस्ते करण्यात आले त्यांचे स्वगत दिगांबर वेताळ यांनी केले गणेश जाधव यांचे स्वागत सुशिल वेताळ यांनी केले उपस्थितीत उपसरपंच मिनाताई सचिन चव्हाण आश्विनीताई दिलिप चव्हाण अजय चव्हाण अमोल चव्हाण सागर वेताळ गणेश वेताळ भारत वेताळ रमेश चव्हाण अंकुश वेताळ बारकु वेताळ आदि ग्रामस्थ उपस्थित होते.



## संगीता, आरती, लक्ष्मी अखेर ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** छोट्या-मोठ्या चोऱ्या करीत पोलीसांना गुंगारा देण्यात तिघीही पटाईत. किरकोळ गुन्हा म्हणून पटकन सुटायच्या पण. यावेळी मात्र त्यांनी कार्यक्षेत्र वाढविले. आता एका महिला उद्योजकाकडे त्यांनी हातसफाई दाखविली. एकीला पकडले तेव्हा संगीता, आरती, लक्ष्मी गुन्हा कबूल करून मोकळ्या झाल्या. पोलीस दफ्तरी या तिघींची नोंद सराईत चोर म्हणून झाली आहे. वर्धेत हात मारणाऱ्या तिघींनीही यावेळी ग्रामीण भागात म्हणजे समुद्रपूर तालुक्यातील वायगाव हळद्या येथे स्वारी केली. हळद उद्योग चालविणाऱ्या ज्योती पाटील यांच्या प्रकल्पात घुसखोरी करीत त्यांनी बॉयलर, कोईल, मोटार पंप, बॉडी कव्हर व अन्य साहित्य लंपास केले. अंदाज घेत समुद्रपूर पोलीसांनी वर्धेलगत बोरगाव येथे राहणाऱ्या संगीताच्या घराची तपासणी केली. तेव्हा तिने शेजारीच राहणाऱ्या आरती व लक्ष्मीच्या मदतीने ही चोरी केल्याची कबुली देऊन टाकली. चाळीस हजार रुपये किमतीचे साहित्य जप्त करीत महिला पोलीसांनी तिघींनीही जेरबंद केले.काही जप्त व्हायचा आहे.

## राज्य कामगार विमा रुग्णालयात महिला दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक महिला दिनानिमित्त राज्य कामगार विमा रुग्णालय चिकलठाणा संभाजीनगर येथे नुकताच जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न झाला. या दिनाचे औचित्य साधून विमा रुग्णालयातील सर्व महिला कर्मचाऱ्यांनी एकत्र येत विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यात प्रामुख्याने भरड धान्याचे भित्तिपत्रक तयार करण्यात आले होते. तसेच भरड धान्याचे विविध पदार्थ तयार करून भरड धान्याचे फायदे या माध्यमातून दाखवण्यात आले. तसेच वकृत्व स्पर्धेचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये महिला कर्मचारी सहभागी झाल्या होत्या. यावेळी वैयक्तिक व सांघिक नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी महिलांमध्ये होणाऱ्या विविध प्रकारच्या कर्करोगाविषयी डॉ. अनुप तोष्णीवाल यांनी विशेष मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्य कामगार विमा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक श्री डॉ. विवेक भोसले होते. याप्रसंगी डॉ. सचिन फडणीस, डॉ. अंजली बनसोड, डॉ. राठोड सर, डॉ. मीनाक्षी राठोड डॉ. अर्चना भांडेकर, डॉ. संगीता शिंदे, डॉ. प्रतिभा पालवदे, डॉ. रेणू बोराळकर, डॉ. ज्योती जगताप, प्रभारी अधिसेविका श्रीमती रजनी भावसार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व महिला कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# पदाला न्याय देण्यासाठी आपल्या कौशल्याचा वापर करा : वसंत मुंडे

## पत्रकारांच्या दुःखात राज्य पत्रकार संघ कायम मदतीला : विश्वास आरोटे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी/अहमदनगर :** संघटनेत जबाबदारी स्वीकारलेल्या पदाला आपल्या क्षमता वापरुन न्याय देत वृत्तपत्र क्षेत्राची प्रतिमा उंचावण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी काम करावे. अडचणीतील पत्रकारांना तो कोणत्या संघटनेत काम करतो हे न पाहता त्याला मदत करण्याची भूमिका घ्यावी असे सांगुन वृत्तपत्र व्यवसायाचे अर्थकारण बिघडल्यामुळे पत्रकारांनी नव्या संधींचा शोध घेतला पाहिजे असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केले. तर पदाधिकाऱ्यांनी केवळ ओळखपत्रापुरते काम न करता सामाजिक बांधिलकी जपावी. तरुण पत्रकारांना संधी द्यावी असे आवाहन सरचिटणीस विश्वास आरोटे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे वार्षिक पदाधिकारी अधिवेशन शिर्डी (जि.अहमदनगर) येथे शुक्रवार दि. 10 मार्च रोजी राज्य संघटक संजय भोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व सरचिटणीस विश्वास आरोटे यांच्या उपस्थित झाले. राज्यभरातील संघटनेचे विभागीय अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष, तालुका, शहर असे पाचशेहून अधिक पदाधिकारी सहभागी झाले होते. मागील वर्षभरातील कार्य अहवाल जिल्हाध्यक्षांनी प्रदेशाध्यक्षांकडे सादर केला. यावेळी बोलताना वसंत मुंडे यांनी संघटनेचे महत्व स्पष्ट करत संघटनेत स्वीकारलेली पदाची जबाबदारी यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी आपल्या क्षमतांचा वापर करावा. जिल्हा, तालुका पातळीवर अध्यक्षांच्या कामावरच संघटनेची ओळख आणि राज्यभरातील ताकद निर्माण होते. पत्रकारांच्याही अनेक संघटना असल्या तरी ते सदृढ लोकशाहीचे प्रतिक आहे. त्यामुळे अडचणीच्या काळात पत्रकार कोणत्या संघटनेचा आहे हे न पाहता त्याला मदत करण्याची भूमिका सर्वांनी घ्यावी. वृत्तपत्र क्षेत्रात कोरोनानंतर अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. जाहिराती कमी झाल्याने अर्थकारण बिघडले आहे. त्यामुळे या क्षेत्राला अधिक सक्षम करण्यासाठी वृत्तपत्रांनी अंकाची विक्री किंमत वाढवावी यासाठी संघटनेने मागच्या दोन वर्षांपासून सुरू केलेल्या चळवळीला चांगले यश आले असुन चारशेपेक्षा




अधिक दैनिकांनी विक्री किंमत वाढवली आहे. वृत्तपत्र माध्यमातील आर्थिक अस्थिरता लक्षात घेऊन पत्रकारांनाही आता नव्या संधी शोधाव्या लागतील आणि सक्षम व्हावे लागेल असे आवाहनही त्यांनी केले. तर सरचिटणीस विश्वास आरोटे यांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कोरोना काळात आणि अतिवृष्टीत अडचणीतील लोकांना मदत करण्यासाठी मोठी भूमिका निभावली. सामाजिक बांधिलकी म्हणून राज्य पत्रकार संघ आपत्तीच्या काळात मदतीसाठी पुढे असतो. पत्रकाराचा अचानक मृत्यु झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना मदत केली जाते. तर पत्रकार आजारी असल्यानंतरही त्यांना मदतीचा हात दिला जातो. सुखात नाही पण दुःखात संघ कायम पत्रकारांच्या पाठीमागे असतो. त्यामुळे राज्यभरातील पदाधिकाऱ्यांनी भविष्यातही याच पध्दतीने काम करुन आपली ओळख निर्माण करावी असे त्यांनी सांगितले. मागील वर्षभरात उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागीय आणि जिल्हाध्यक्षांचा विशेष सन्मान करण्यात आला. परभणीचे विजयकुमार कुलदीपके यांनी आजारपणात पत्रकारांना केंद्र सरकारच्या योजनेतून मदत मिळवून दिल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी जळगाव येथील मंगळग्रह संस्थानचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ पत्रकार दिगांबर महाले, विभागीय अध्यक्ष महेश पानसे, बाळासाहेब देशमुख, प्रविण सपकाळे, वैभव स्वामी, नितीन शिंदे, निलेश सोमानी, किशोर रायसाकडा, विभागीय कार्याध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील, उपाध्यक्ष बाजीराव फरकाटे यांचाही सन्मान करण्यात आला. अहमदनगर जिल्हाध्यक्ष दत्ता पाचपुते आणि सचिव दत्ता गाडगे यांनी या अधिवेशनाचे उत्तम नियोजन करुन यशस्वी केले.

# लखमापूर येथे युवकाची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यातील लखमापुर येथे



वैभव पंढरीनाथ थोरात (वय-२१) या युवकांने आत्महत्या केल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. वैभव हा एक दिवस अगोदर घरात कोणालाही न सांगता घरातून बाहेर गेला होता. वैभव घरी परत न आल्याने आई वडील व नातेवाईक यांनी शोध करण्यास सुरुवात केली. परंतु तो कुठेही सापडला नाही. परंतु आज रंगपंचमीच्या दिवशी लखमापुर गावांला पाणीपुरवठा करणाऱ्या ग्रामपंचायतीच्या फळ विहिरीत कोणाचे तरी प्रेत पाण्यावर तरंगतांना काही नागरिकांनी पाहिले. व सर्वत्र चौकशी सुरु केल्यानंतर गायब झालेला वैभव थोरात चा तो मुत्युदेह असल्याची खात्री झाली.


वैभव अत्यंत गरीब घरातील मुलगा होता. वडील टेलर चे काम करतात व आई मोलमजुरी चे काम करते. या कुटुंबाला वैभव हा एकलुता एक मुलगा होता. त्यामुळे ऐन्य रंगपंचमीच्या दिवशी लखमापुर गावांवर शोककळा पसरली असल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

यावेळी वणी पोलीस ठाण्याचे देशमुख व इतर त्यांचे सहकारी उपस्थित होते.यावेळी पंचनामा करून प्रेत शेवविछदनासाठी पाठविण्यात आले.मुत्यूचे कारण समजु शकले नसल्याने आस्कमित मुत्यू ची नोंद करण्यात आली आहे. यावेळी ग्रामविकास अधिकारी पाटील, ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी यांचे सहकार्य मोलाचे लागले.

# शेतकरी आत्महत्या थांबाव्यात म्हणून आज किनगावहून पदयात्रेस प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** किसानपुत्र आंदोलनाच्या अवहानानुसार शेतकरी आत्महत्या थांबाव्यात म्हणून आज (13 मार्च) रोजी किनगाव (ता.यावल, जि. जळगाव) येथून पदयात्रा निघत आहे. ही पदयात्रा चोपडा, अंमळनेर मार्गे 19 मार्च रोजी धुळ्याला पोचणार आहे. किसानपुत्र आंदोलनाचे अमर हबीब यांनी सांगितले की, डॉ. राजीव बसर्गेकर (नवी मुंबई) आणि सुभाष कच्छवे (परभणी) हे या पदयात्रेचे संचालन करणार आहेत. पदयात्रेत एकूण अकरा जण पूर्णवेळ राहणार असून अनेक लोक या गावातून त्या गावापर्यंत चालणार आहेत.




शेतकऱ्यांच्या मालाचे भाव कोसळत आहेत. कापूस, सोयाबीन, कांदा, हरभरा आदी पिकांना केवळ सरकारी हस्तक्षेपामुळे फटका बसला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे. या परिस्थितीत शेतकऱयांच्या बाजूने आवाज उठवावा म्हणून ही पदयात्रा काढण्यात आली आहे, असे अमर हबीब यांनी सांगितले. 19 मार्च रोजी (साहेबराव करपे कुटुंबियांच्या सामूहिक आत्महत्येच्या दिवशी) राज्यभर अन्नत्याग आंदोलन केले जाणार आहे. लाखो सुजाण नागरिक वैयक्तिक उपवास करतील तर शेकडो ठिकाणी सामूहिक उपोषण केले जाणार आहे. किसानपुत्र आंदोलनाच्या आवाहानानुसार 2017 पासून लाखो लोक 19 मार्चला अन्नत्याग (उपवास) करतात. धुळ्यात समारोप किनगावहून निघालेल्या या पदयात्रेचा समारोप जेल मैदान येथे सभा घेऊन होणार आहे. या सभेत शेतकरी संघटनेचे अध्यक्ष ललित बहाळे (अकोला) प्रख्यात विचारवंत विनय हार्डीकर (पुणे) किसानपुत्र आंदोलनाचे कार्यकर्ते अमर हबीब (आंबाजोगाई) हे मार्गदर्शन करणार आहेत.

# फ्रीडम स्टोरी सिंधुगुर्ग जिल्हा सचिवपदी बाबू वरक

आधुनिक केसरी न्यूज



**सिंधुदुर्ग :** साहित्य, कला, सामाजिक, शैक्षणिक तथा सांस्कृतिक क्षेत्रातील विविध समस्या सोडविण्याबाबत वेळोवेळी दिलेल्या योगदानाबद्दल बाबू वरक यांची भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच तथा फ्रिडम स्टोरी या संघटनेच्या सिंधुगुर्ग जिल्हा सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. आपल्या कुशल नेतृत्वाने शुभ कार्याचा जागर असाच अविरतपणे तेवत रहावा,अशी आशा करून आपण ही जबाबदारी घेऊन साहित्य व सांस्कृतिक योगदानास सहकार्य करून कार्याचा शुभारंभ करावा अशा शुभेच्छा संघटनेचे अध्यक्ष विशाल नामदेव सिरसट यांनी दिल्या आहेत. या निवडीबद्दल बाबू वरक यांचे सर्वत्र कौतूक होत आहे.

# गोळीबार प्रकरणी आरोपींचा शोध सुरू

## गुन्हेशाखेची पाच पथके तैनात

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सिडको एन-२ परिसरात असलेल्या एका फायनान्स सर्व्हीसेसच्या चालकावर गोळीबार करीत लुटण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना शुक्रवारी रात्री पावणेनऊ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेनंतर फायनान्स चालकावर गोळीबार करून लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या युवकांचा शोध घेण्यासाठी गुन्हेशाखेची पाच पथके तैनात करण्यात आली असल्याची माहिती पोलिस सुत्रांनी शनिवारी (दि.११) कळविली आहे. दरम्यान, घटनास्थळी पोलिसांना रिव्हॉल्वरच्या तुटलेल्या स्प्रिंगसह तीन जीवंत काडतुसे मिळाली आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एपीआय कॉर्नरजवळील जयभवानी पेट्रोल पंपाच्या पाठीमागे विलास राठोड (रा.सिडको परिसर) यांचे शुभम फायनान्स ॲण्ड मल्टीसर्व्हीसेस नावाचे कार्यालय आहे. विलास राठोड हे शुक्रवारी रात्री कार्यालयात बसून काम करीत असतांना पेट्रोल पंपाकडून दोन युवक पायी चालत त्यांच्या कार्यालयाकडे आले. त्यापैकी एकाने कार्यालयात प्रवेश केला तर दुसरा कार्यालयाबाहेर थांबला होता. कार्यालयात प्रवेश केलेल्या युवकाने हातातील पिस्तुलातून विलास राठोड यांच्यावर गोळी झाडली. मात्र सुदैवाने ती गोळी प्रिंटरवर जाऊन लागली. दरम्यान, गोळीबार केल्यावर लुटारू तरुणाने गल्ल्यातील दोनशे रुपये काढून घेतले. त्यानंतर आणखी पैसे काढ असा विलास राठोड यांना दम दिला. तसेच ओरडत असतानाच पिस्टलमधून दुसरी राऊंड फायर करण्याच्या प्रयत्न केला असतानाच पिस्तुलची स्प्रिंग तुटली. आपण पकडले जाऊ या भीतीने गोळीबार करणाऱ्या तरूणाने घटनास्थळी तीन जिवंत काडतुसे टाकून धुम ठोकली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त शिलवंत नांदेडकर, गुन्हे शाखेचे निरीक्षक अविनाश आघाव, मुकुंदवाडी निरीक्षक विठ्ठल ससे, जवाहरनगरचे निरीक्षक व्यंकटेश केंद्रे, गुन्हे शाखेचे सहायक निरीक्षक काशिनाथ महांडुळे, उपनिरीक्षक अमोल म्हस्के, प्रविण वाघ, अजित दगडखैर, गजानन सोनटक्के हे घटनास्थळी दाखल झाले. फायनान्स चालकावर गोळीबार करून लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी गुन्हेशाखेची पाच पथके तैनात करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र Business Katta












# अवैध शौचालय बांधकाम; दादुलगाव ग्रा.पं.ची धडाकेबाज कार्यवाही

आधुनिक केसरी न्यूज

**सागरकुमार झनके**

**जळगाव जा :** तालुक्यातील दादुलगाव गटग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या गौलखेड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील सरकारी जागेवर होत असलेले अवैध शौचालय बांधकाम तत्काळ थांबवण्यासाबाब ग्रामपंचायत प्रशासनाने कार्यवाही केली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, गौलखेड गावच्या मध्यभागी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. पुतळ्यासमोरील जागेला लागूनच असलेल्या सरकारी जागेवर त्याच गावातील रहिवासी असलेले राजेंद्र प्रकाश रणीत यांनी अवैधपणे शौचालयाचे बांधकाम सुरू केले होते. याबाबत सागरकुमार झनके यांनी ६ मार्च रोजी बाबासाहेबांच्या पुतळ्यासमोरील जागेवर अवैधपणे होत असलेले शौचालयाचे बांधकाम तत्काळ थांबवण्याबाबत ग्रामपंचायत प्रशसनाकडे लेखी तक्रार दाखल केली होती.त्याबाबतच्या बातम्या विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. सदर घटणेची गांभीर्याने दखल घेत ग्रामसेवक अनिल अंबडकर यांनी ११ मार्च रोजी गौलखेड येथे भेट दिली असता, बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील जागेलगत असलेल्या सरकारी जागेवर अवैधपणे शौचालयाचे बांधकाम केलेले आढळून आले.त्यामुळे त्यांनी त्याबाबत संबधीत व्यक्तीला तत्काळ सुरू असलेले अवैध बांधकाम बांधकाम थांबवून, आजपावेतो केलेले बांधकाम काढून घेण्यास सांगीतले. तसेच, तुमच्या अशा कृत्यामुळे ग्रामपंचायतीची बदनामी झाली असून आपण तत्काळ ते अतीक्रमण काढून टाकवे अन्यथा आपणाविरद्ध म.ग्रा.अधिनियम १९५९ कलम ५३ नूसार कार्यवाही करण्यात येईल व वेळ प्रसंगी सर्व अतीक्रमण ग्रामपंचायत स्वतःहून तोडून टाकेल व यासाठी येणारा सर्व खर्च आपणाकडून वसूल करण्यात येईल. त्याबाबचे लेखी आदेश राजेंद्र प्रकाश रणीत यांना देण्यात आले आहे.





# किणी गावात आढळले दुर्मिळ उदमांजर

आधुनिक केसरी न्यूज

कोल्हापूर : जिल्ह्यातील चंदगड तालुक्यातील किणी या गावात दिलीप बिरजे सर यांच्या घरी दुर्मीळ अशा उदमांजराला पकडण्यात वर्ल्ड फॉर नेचरचे सदस्य अनिल हुंदळेवाडकर व जोतिबा जोशीलकर यांना यश आले. या उदमांजरास वनविभागाच्या ताब्यात देण्यात आले आहे. किणी गावात शुक्रवारी सायंकाळी दिलीप बिरजे सर यांच्या घरी एक दुर्मीळ उदमांजर अन्न पाण्याच्या शोधात आले. ह्यावेळी बिरजे यांच्या कुटुंबियांना उदमांजर दिसले पण त्यांनी रानमांजर आहे, असे समजून सर्वांनी त्याला हाकलण्याचा प्रयत्न केला, परंतु ते उदमांजर घरातील अडगळीत शिरले. ते बाहेर येत नसल्याने बिरजे सरांच्या कुटुंबीयांनी ही सर्व घटना किणीतील वर्ल्ड फॉर नेचरचे प्राणिमित्र अनिल हुंदळेवाडकर यांना फोन करून सांगितली. अनिल हुंदळेवाडकर यांनी घरातील खोलीत जाऊन त्यास पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु बराच वेळ होऊनही त्या उदमांजरास पकडण्यात यश मिळत नव्हते. अखेरीस वर्ल्ड फॉर नेचरचे सर्पमित्र जोतिबा जोशीलकर यांनी सांगितलेल्या सूचनेनुसार रात्री उशिरा त्याला पकडण्यात आले. यावेळी वर्ल्ड फॉर नेचरचे अनिल हुंदळेवाडकर, जोतिबा जोशीलकर, अभिजीत वाघमोडे, दिलीप बिरजे आदींचे सहकार्य लाभले. वर्ल्ड फॉर नेचरने सकाळी या घटनेची माहिती पाटणे वनविभागाचे रेंज फॉरेस्ट ऑफिसर प्रशांत आवळे यांना दिली व वनविभागास माहिती देण्यात आल्यानंतर वनविभागाचे वनरक्षक दिपक कदम, होगाडे यांनी घटनास्थळी जाऊन उदमांजरास ताब्यात घेऊन जंगलात परत त्याच्या मूळ नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. उदमांजर हा प्राणी प्रामुख्याने रात्री वावरतो. याला स्थानिक भाषेत फटकूरा असेही म्हणतात. जंगलात बीळ करून राहणारा हा प्राणी सस्तन व मांसाहारी प्राणी असून, उंदरासारखे लहान प्राणी, पक्षी, कीटक हे त्याचे खाद्य आहे. उन्हाळ्यात जंगलात मोठ्या प्रमाणात लागणाऱ्या वणव्यामुळे हे उदमांजर मनुष्य वस्तीत आले असण्याची शक्यता आहे. चंदगड तालुक्यात प्रबोधनामुळे होत असलेल्या प्राण्यांविषयीच्या जागरुकतेमुळे तसेच पाटणे वनविभागाने दाखवलेल्या तत्परतेमुळे एका मुक्या जीवाचे प्राण वाचले. आज केलेले हे कार्य खूप कौतुकास्पद आहे त्यासाठी सर्वांचे मनापासून आभार

# जीएसटी विभागाची छापेमारी; सराफा दुकानावर कारवाई

आधुनिक केसरी न्यूज




**छत्रपती संभाजीनगर :** जीएसटी विभागाच्या वसुली पथकाने शहरात अचानकरित्या सराफा दुकानावर छापेमारी सुरू केल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे. जालना रोडवरील बाफना ज्वेलर्स या सराफा दुकानावर जीएसटी वसुली विभागाच्या पथकाने छापा मारला. या कारवाईत पथकाच्या हाती अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे लागली असून त्या कागदपत्रांची झाडाझडती घेण्याचे काम शनिवारी ( दि.११ ) रात्री उशिरापर्यंत सुरू होते. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कर चोरीप्रकरणी जीएसटीच्या वसुली पथकाने ही छापेमारी केली आहे. तर कारवाईसाठी आलेल्या पथकाने सुरुवातीला दुकानातील सर्व फोन बंद करून, त्यानंतर चौकशी सुरु केली. तसेच या पथकाने दुकानातील ज्वेलरी खरेदी-विक्री संबधित कागदपत्रे तपासली आहे. सोबतच वेगवेगळ्या बिलांची तपासणी करण्यात येत असून भरलेल्या जीएसटीबाबत चौकशी केली जात आहे. संबधित ज्वेलर्सने कर चोरल्याचा जीएसटी पथकाला संशय असून, त्यानुसार चौकशी केली जात असल्याची माहिती देखील सूत्रांनी दिली आहे. आर्थिक वर्षातील मार्च हा अखेरचा महिना असल्याने करवसूली यंत्रणा सक्रीय झाली आहे. जीएसटी विभागाच्या वसुली पथकाने शुक्रवारी दुपारी अचानकरित्या बाफना ज्वेलर्स या दुकानावर छापा मारला. पथकाने दुकानातील कर्मचाऱ्यांना दुकानातच थांबवून ठेवत झाडाझडती घेण्यास सुरूवात केली. जीएसटी विभागाच्या वसुली पथकाने अचानकरित्या केलेल्या कारवाईमुळे बाफना ज्वेलर्समधील कर्मचाऱ्यांत एकच खळबळ उडझली होती.

# कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील बेंदवाडी येथे कर्ज बाजारीपणाला कंटाळून राजू लालसिंग बेडवाल ( वय ४० ) या शेतकऱ्याने गळफास घेवून आत्महत्या केली. राजू बेडवाल यांनी कपाशीचे पिक घेतले होते. परंतु कपाशीला भाव मिळत नसल्याने डोक्यावर असलेल्या कर्जाची परतफेड कशी करायची याची चिंता त्यांना लागली होती. राजू बेडवाल यांच्या डोक्यावर पीक कर्जाचे ६ लाख रूपये आणि हार्वेस्टर व ट्रॅक्टरचे १६ लाख रूपये असे एकूण २२ लाख रूपयांचे कर्ज होते.

राजू बेडवाल यांनी शुक्रवारी सायंकाळी आपल्या शेतातील गोठ्यात गळफास घेतला होता. हा प्रकार बेडवाल यांच्या कुटुंबियांच्या लक्षात आल्यावर त्यांनी राजू बेडवाल यांना फासावरून उतरवरून उपचारासाठी वैजापुर येथील उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषीत केले. या प्रकरणी वैजापुर पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक फौजदार निकाळजे व पोलिस अंमलदार गणेश कुलटे करीत आहेत.

# गोदावरीत बुडाल्याने चार युवकांचा दुर्दैवी मृत्यू

## मढी येथील दर्शनासाठी जाताना पालखेड येथील युवक मयत

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील मढी येथे दर्शनासाठी चाललेल्या चार युवकांचा नेवासा तालुक्यातील सिद्धेश्वर मंदिर येथील गोदावरी नदीत बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी ( दि.११ ) दुपारी तीन वाजेच्या सुमारास घडली. सुदैवाने एका युवकाला पोहा येत असल्यामुळे तो बचावला.

गोदावरी नदीत बुडून मृत्यू झालेले चारही युवक वैजापुर तालुक्यातील पालखेड येथील असल्याची माहिती नेवासा पोलिस स्टेशनचे निरीक्षक शिवाजीराव डोईफोडे यांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शंकर परसनाथ घोडके ( वय २९ ), बाबासाहेब अशोक गोरे ( वय ३१ ), आकाश भागीनाथ गोरे ( वय १९ ), नागेश दिलीप गोरे ( वय १९, चौघेही राहणार पालखेड, ता.वैजापुर,जि. छत्रपती संभाजीनगर ) असे मयत युवकांची नावे आहेत. मयत चारही युवक नेवासा तालुक्यातील श्री क्षेत्र सिध्देश्वर मंदिर मढी येथे दर्शनासाठी जात होते.

कायगाव टोका परिसरातील सिध्देश्वर मंदिर येथे आल्यावर ते गोदावरी नदीत स्नान करण्यासाठी उतरले होते. सर्वप्रथम दोन जण उतरले होते परंतु त्यांना पोहता येत नसल्याने ते बुडत असल्याचे पाहुन इतर तीन जणांनी पाण्यात उतरून त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला. यामध्ये पोहता येत नसलेल्या चार जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. तर एक जणाला पोहता येत असल्यामुळे तो बचावला. दरम्यान, या घटनेची माहिती मिळाल्यावर नेवासा पोलिस स्टेशनचे निरीक्षक शिवाजीराव डोईफोडे, उपनिरीक्षक मनोज मोढवे, पोलिस अंमलदार संजय माने, अशोक कुदळे, रामचंद्र वैद्य आदी घटनास्थळी दाखल झाले. कायगाव व टोका येथील पोहता येणारे युवक नदीत उतरले. त्यांनी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास शंकर घोडके, आकाश गोरे आणि बाबासाहेब गोरे यांचे मृतदेह पाण्याबाहेर काढले. सायंकाळी उशिरापर्यंत नागेश गोरे याचा मृतदेह शोधण्याचे काम सुरू होते. या घटनेची माहिती मिळताच मयत युवकांच्या नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेत एकच हंबरडा फोडला. या घटनेमुळे पालखेड गावावर शोककळा पसरली आहे.

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).

आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.

फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in